सत्यमेव जयते

# विधानसभा आश्वासन समिती

(२०१५-२०१६)

( तेरावी महाराष्ट्र विधानसभा )

# तिसरा अहवाल

(सन २०१३ च्या दुस-या (पावसाळी) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल)
(दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी विधानसभेस सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१५

# महाराष्ट्र विधानसभा

## आश्वासन समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

# तिसरा अहवाल

(सन २०१३ च्या दुस-या (पावसाळी) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल)

# विधानसभा आश्वासन समिती
## (२०१३-२०१४)

**समिती प्रमुख**

१. श्री.नवाब मलिक, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

२. श्री. विलासराव (काका)पाटील , वि.स.स.

३. श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.

४. श्री. रामप्रसाद कदम - बोर्डीकर, वि.स.स.

५. श्री. सुरेशकुमार जेथलिया,वि.स.स.

६. श्री. कैलास गोरंट्याल, वि.स.स.

७. श्री. विलास तरे, वि.स.स.

८. श्री. किसन कथोरे, वि.स.स.

९. श्री. दिलीप मोहिते, वि.स.स.

१०. श्री. कृषिभूषण साहेबराव पाटील, वि.स.स.

११. श्रीमती संध्यादेवी देसाई उर्फ कुपेकर , वि.स.स.

१२. श्री. प्रकाश मेहता, वि.स.स.

१३. श्री. जयकुमार रावल, वि.स.स.

१४. श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.

१५. श्री. राजन साळवी, वि.स.स.

१६. प्रा. शरद पाटील, वि.स.स.

१७. डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स.

१८. श्री. मंगेश सांगळे, वि.स.स.

१९. श्री. मुफ्ती मोहम्मद इस्माईल अ. खलिक, वि.स.स.

निमंत्रित

• २०. श्री. विजय घोडमारे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. श्रीनिवास जाधव, विशेष कार्य अधिकारी

(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

(४) श्री. जगदीश टोपरे, कक्ष अधिकारी.

• विधानसभा आश्वासन समितीवर मा.अध्यक्ष.महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ नोव्हेंबर,२०१३ रोजीपासून श्री. विजय घोडमारे, वि.स.स. यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.विधानसभा आश्वासन समितीचे सदस्य श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स. यांची मंत्रीमंडळात नियुक्ती झाल्यामुळे रिक्त झालेल्या त्यांचे जागी श्री. सुरेशकुमार जेथलिया. वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ३० जुलै, २०१४ रोजी नामनियुक्ती केली आहे.

# विधानसभा आश्वासन समिती

## (२०१५-२०१६)

समिती प्रमुख

१) श्री. गुलाबराव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

२) श्री. मधुकरराव चव्हाण, वि.स.स.

३) श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.

४) श्री. धनंजय ऊर्फ सुधीर गाडगीळ, वि.स.स.

५) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स.

६) श्री. लक्ष्मण पवार, वि.स.स

७) श्री. विलासराव जगताप, वि.स.स.

८) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

९) श्री. समीर मेघे, वि.स.स.

१०) श्री. जयप्रकाश मुंदडा, वि.स.स.

११) श्री. संजय शिरसाट, वि.स.स.

१२) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स.

१३) श्री. रणजित कांबळे, वि.स.स

१४) श्री. डी.पी.सावंत, वि.स.स.

१५) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

१६) श्री. राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स.

१७) श्री. अवधूत तटकरे, वि.स.स.

१८) श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स.

१९) श्री. विलास तरे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले,उप सचिव

(३) श्री. राजेश तारवी,उप सचिव

(४) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

(५) श्री.संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(६) श्री. जगदीश टोपरे, कक्ष अधिकारी.

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | प्रस्तावना : .. .. | (नऊ) |
| १. | विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्य त आलेल्या विवरणपत्रांची संख्या .. .. | १ |
| २. | विवरणपत्रे विधानसभेस सादर होण्यास झालेला विलंब .. .. | २ |
| ३. | सन १९९१ पासून ते सन २०१५ चे पहिल्या अखेरपर्यंत वर्षनिहाय व विभागनिहाय आश्वासनांची प्रलंबित यादी. .. .. | ३ |
| ४. | अभिप्राय व शिफारशी .. .. | ७ |
| | परिशिष्टे : | |
| | **परिशिष्ट-एक** - आश्वासनांवर विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती .. .. | ३१ |
| | **परिशिष्ट-दोन** -आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रके .. .. | १३७ |
| | **परिशिष्ट-तीन** - आश्वासनांवरील कार्यवाहीचे नमुना विवरण .. .. | ३८९ |
| | **परिशिष्ट-चार**- समितीच्या बैठकांचे कार्यवृत्त .. .. | ३९३ |

## प्रस्तावना

मी. विधानसभा आश्वासन समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन तिच्या वतीने समितीचा तिसरा अहवाल सभागृहास सादर करीत आहे. सन २०१३ च्या दुस-या अधिवेशनात विधानसभेत शासनातर्फे देण्यात आलेली काही प्रलंबित आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही यासंदर्भात विभागांकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्रांची समितीने केलेली छाननी यासंबंधीचा समितीचा हा अहवाल आहे.

सन २०१३ च्या दुस-या अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून सभागृहात देण्यात आलेल्या काही प्रलंबित आश्वासनांच्यासंदर्भात आश्वासन समितीचा सदरहू तिसरा अहवाल तयार करण्यात आला आहे.

आश्वासनांबाबत विभागाने केलेली कार्यवाही परिशिष्ट " एक " मध्ये देण्यात आला असून आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/ परिपत्रके परिशिष्ट " दोन " मध्ये देण्यात आले आहेत. तसेच आश्वासनांबाबतची माहिती सादर करण्याबाबतचे नमुना विवरणपत्र परिशिष्ट " तीन " मध्ये देण्यात आली आहे व समितीच्या बैठकांची संक्षिप्त माहिती परिशिष्ट " चार " मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

समितीने सदरहू अहवालावर दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत विचार करुन तो संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०१५.

समिती प्रमुख,
विधानसभा आश्वासन समिती.

# अहवाल

## सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या

सन २०१३ चे दुस-या अधिवेशनात शासनाने दिलेल्या आश्वासनांपैकी **प्रलंबित ४५१** आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी खाली त्यासमोर दर्शविलेल्या दिनांकास विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**सन २०१३ च्या दुस-या अधिवेशनामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीबाबत पटलावर ठेवलेल्या विवरणपत्रांचे दिनांकनिहाय क्रमांक व संख्या.**

| अ.क्र. (१) | आश्वासन पटलावर ठेवल्याचा दिनांक (२) | आश्वासन क्रमांक (३) | आश्वासन संख्या (४) |
|---|---|---|---|
| (१) | दिनांक १८ डिसेंबर, २०१३ | ७७-अ, १२३, १२५, १२६, १२७, १३९, १४७, १६२, १६४, १६५, १६६, १६७, १६८, १६९, १७०, २५१, २८१, २९६, ३०७, ३१६, ३२५, ३४३, ३४४, ३४५, ३४६, ३४७, ३९६, ३९७, ३९८, ४३४, | ३० |
| (२) | दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ | ८, ९, ११, १९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २९, ३०, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ४२, ६४, ६७, ६८, ७१, ९१, ९२, ११७, ११८, ११९, १२०, १२१, १२९, १३०, १४०, १४१, १४२, १४३, १७३, १७५, १८०, १८१, १८२, १८३, १८४, १८९, १९०, १९०-(अ), १९२, १९८, २०५, २०६, २०७, २०८, २०९, २१०, २११, २३०, २३३, २३६, २३८, २३९, २४०, २४१, २४२, २४३, २४८, २४९, २५०, २५७, २५८, २६९, २७४, २७५, २७६, २७८, २७९, २८८,२८९,२९०,२९५-(अ),३१३,३१४,३१५,३२६,३२७,३२८,३३१, ३३६, ३४१, ३४२, ३५१, ३६८, ३६९, ३७४, ३७५, ३८७, ३८८, ३८९, ३९०, ३९१, ४०३, ४०४, ४१५, ४३५, ४४६, ४४७, ४४८, | १०७ |
| (३) | दिनांक १२ जून, २०१४ | १, २, ३, ४, ६, १८, ४०, ४४, ४६, ४७, ४८, ५०, ५१, ५२, ५६, ६३, ६५, ६६, ६९, ७२,७३, ७४, ७५, ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ८६, १०२, १०३, १०४, १०६, १०८, १०९, ११०, १११, ११२, **११५(वगळले)**, ११६, १२२, १२८, १३१, १३२, १३३, १३४, १३५, १३६, १३७, १४५, १४८, १४९, १५४, १५५, १५६, १५८, १७१, १७६, १७८, १८५, १८६, १८७, १८८, १९७, १९९, २०२, २१३, २१५, २१६, २२९, २३१, २३२, २३४, २५२, २५३, २५६, २६३, २७०, २७१, २८०, २८५, २८६, २९९, ३००, ३०१, ३०३, ३०४, ३११, ३१२, ३१८, ३१९, ३२०, ३२१, ३२४, ३५२, ३५३, ३८३, ३८४, ३८५, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ४०८, ४०९, ४१६, ४१७, ४१८, ४१९, ४२०, ४२९, ४३०, ४३६, ४३९, ४४२, ४४३, ४४४, | १२० |
| (४) | दिनांक १८ डिसेंबर, २०१४ | ७, १०, **१६, १७ (वगळले)** ३९, ४१, ५८, ५९, ६२, ७६, ८७, १०१, १२४, १४४, १४६, १५९, १६३, २३५, २८२, ३२२, ३२३, ३३२, ३३९, ३४०, ३४८, ३४९, ३५०, ३५५, ३५६, ३५७, ३६७, ४१०, ४११, ४१३, ४१४, ४२४, ४२६, ४२८, ४४१. | ३९ |
| (५) | दिनांक ७ एप्रिल, २०१५ | ५७, ९०, १००, २१४, २७२, २७३, ३३८, ४०१, ४०२, | ९ |
| (६) | दिनांक २१ जुलै, २०१५ | ६०, २५४, २५५, २५९, २६०, २६१, २६२, ३०२, ३०९, ३१०, ३३३, ४४०, | १२ |
| | | | ३१७ |
| | | • **महसूल व वन विभागाचे आश्वासन क्र.२२० तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे आश्वासन क्रमांक२४५ व २४७ अशी एकूण ३ आश्वासने समितीने विचारविनिमय करुन वगळली आहेत. वगळलेली ३ आश्वासने + पटलावर ठेवलेली व समितीने मान्य केलेली आश्वासने ३१७ अशी एकूण मान्य केलेली आश्वासने ३१७ + ३ = ३२०** | + ३<br>--------<br>३२० |

## विवरणपत्रे सादर होण्यास झालेला विलंब.

सन २०१३ च्या दुस-या अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून देण्यात आलेल्या एकूण ४५१ आश्वासनांपैकी मा.संसदीय कार्य मंत्री यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या कार्यवाहीच्या विवरणपत्राची दिनांक निहाय संख्या विचारात घेता असे दिसून येते की, साधारणत: १०८ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ४ महिना एवढा कालावधी लागलेला आहे, १२० आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ७ महिने ११ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे. ३९ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष १ महिना १७ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे. ९ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष ५ महिना ६ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे. १२ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष ८ महिना २१ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे. अद्याप १३१ आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे प्रलंबित आहेत. या प्रलंबित आश्वासनांची सविस्तर माहिती देणारे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

### प्रलंबित आश्वासनांची विभागनिहाय यादी

| अ. क्र. | विभागाचे नांव | आश्वासन क्रमांक | आश्वासनांची एकूण संख्या. |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | गृहनिर्माण विभाग. | ३१, ३२, २८३, २८४, ४०६, ४०७, | ०६ |
| २ | महसूल व वन विभाग | २८, ११३, ११४, १५०, १५१, १५२, १५३, १९१, १९३, १९४, १९५, १९६, २१२, २१७, २१८, २१९, २२१, २६४, २६५, २६६, २६७, २६८, २७७, ३५८, ३५९, ३६०, ४३१, | २७ |
| ३ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग. | ४३, ४५, ७०, १७२, १७४, १७७, १७९, ३०६, ३५४, | ०९ |
| ४ | नगरविकास विभाग | १२, २७, ८८, ८९, ९३, ९४, ९५, ९६, ९७, ९८, ९९, १०५, १०७, २००, २०१, २२२, २२३, २२४, २२५, २२६, २२७, २२८, २३७, ३३७, ३६१, ३६२, ३६३, ३६४, ३६५, ३६६, ३७०, ३७१, ३७२, ३७३, ३७६, ३७७, ३७८, ३७९, ३८०, ३८१, ३८२, ३८६, ३९९, ४००, ४०५, ४३२, ४३३, | ४७ |
| ५ | गृह विभाग | १३, १५, ५३, ५४, ५५, ७७, १३८, १६०, १६१, २८७, २९१, २९२, २९३, २९४, २९५, ४३८, ४४५. | १७ |
| ६ | सार्वजनिक बांधकाम विभाग | १४, ३१७, | ०२ |
| ७ | नियोजन विभाग | ३०५, | ०१ |
| ८ | अन्न व नागरी पुरवठा विभाग | ३०८, | ०१ |
| ९ | कृषी व पदुम विभाग | २९७, २९८, ३२९, | ०३ |
| १० | ग्रामविकास व जलसंधारण विभाग | ४९, ४२१, ४२२, ४२३, | ०४ |
| ११ | आदिवासी विकास विभाग | २०३, २०४, ४१२, ४२५, ४२७, ४३७, | ०६ |
| १२ | वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग | ६१, ३३४, ३३५, | ०३ |
| १३ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | १५७, २४४, २४६ | ०३ |
| १४ | सामान्य प्रशासन विभाग | ३३० | ०१ |
| १५ | सार्वजनिक आरोग्य विभाग | ५ | ०१ |
| | | एकूण .. | १३१ |

- पुढील क्रमांक कोणत्याही आश्वासंनाना देण्यात आले नाहीत.

उपरोक्त आश्वासनांबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही/अंतरिम माहिती देखील, संबधित विभागांनी समितीला पुरविलेली नाही. याबाबत समिती नापसंती व्यक्त करीत आहे. याबाबत विभागाने वेळीच कार्यवाही केली असती तर ही आश्वासने प्रलंबित राहिली नसती असे समितीला वाटते. आता तरी विभागाने या प्रकरणी गंभीर दखल घेऊन प्रलंबित असलेल्या आश्वासनांबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर लवकरात लवकर ठेवण्याची व्यवस्था करावी. या आश्वासनांबाबत शासनातर्फे करण्यात आलेल्या " **कार्यवाहीचे विवरण** " जरी सादर करण्यात आलेले नसले तरी या आश्वासनांच्या क्रमांकानुसार करण्यात आलेल्या नोंदी सभागृहाच्या माहितीसाठी अहवालामध्ये अंतर्भूत करण्याचे समितीने ठरविले आहे. " **कार्यवाहीचे विवरणपत्र तात्काळ सादर करण्यात यावे** " असे त्या ठिकाणी नमूद करण्यात आले आहे. एक महिन्याच्या आत असे विवरणपत्र सादर करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

## विधानसभा

### सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनापर्यंत दिलेल्या आश्वासनांपैकी प्रलंबित असलेल्या आश्वासनांची विभागनिहाय यादी

### (सन २०१५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात आश्वासन पूर्ततेची विवरणपत्रे विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतरची स्थिती)

| अ.क्र. (१) | विभागाचे नांव (२) | सन १९९१ ते सन २००० पर्यंतची प्रलंबित आश्वासने (३) | सन २००० ते सन २०१५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशना-पर्यंत प्रलंबित आश्वासने (४) | एकूण प्रलंबित आश्वासने (५) |
|---|---|---|---|---|
| १ | महसूल व वन विभाग | ०९ | ५०३ | ५१२ |
| २ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | निरंक | १४७ | १४७ |
| ३ | नगर विकास विभाग | १४ | ७९० | ८०४ |
| ४ | सार्वजनिक आरोग्य विभाग | निरंक | १४६ | १४६ |
| ५ | गृह विभाग | निरंक | २७४ | २७४ |
| ६ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | निरंक | १३६ | १३६ |
| ७ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | निरंक | १८६ | १८६ |
| ८ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग | निरंक | १४५ | १४५ |
| ९ | उच्च व तंत्रशिक्षण विभाग | निरंक | ४५ | ४५ |
| १० | जलसंपदा विभाग | निरंक | ५७ | ५७ |
| ११ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | निरंक | ६८ | ६८ |
| १२ | कृषी व पदुम विभाग | निरंक | ९३ | ९३ |
| १३ | सार्वजनिक बांधकाम विभाग | निरंक | १०७ | १०७ |
| १४ | गृहनिर्माण विभाग | निरंक | ८० | ८० |
| १५ | महिला व बालविकास विभाग | निरंक | १७ | १७ |
| १६ | सहकार व वस्त्रोद्योग विभाग | निरंक | ८० | ८० |
| १७ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | निरंक | ५९ | ५९ |
| १८ | सामान्य प्रशासन विभाग | निरंक | २६ | २६ |
| १९ | आदिवासी विकास विभाग | निरंक | ३४ | ३४ |
| २० | नियोजन विभाग | निरंक | ४३ | ४३ |
| २१ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | निरंक | ३२ | ३२ |
| २२ | विधी व न्याय विभाग | निरंक | ३० | ३० |
| २३ | वित्त विभाग | निरंक | ०३ | ०३ |
| २४ | पर्यावरण विभाग | निरंक | ३८ | ३८ |
| २५ | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | निरंक | ०३ | ०३ |
| २६ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | निरंक | ३५ | ३५ |
| २७ | अल्पसंख्याक विभाग | निरंक | २० | २० |
| २८ | मराठी भाषा विभाग | निरंक | ०५ | ०५ |
| २९ | संसदीय कार्य विभाग | निरंक | निरंक | निरंक |
| | एकूण . . | २३ | ३२०२ | ३२२५ |

# महाराष्ट्र विधानसभा

प्रलंबित आश्वासनांची वर्षनिहाय व अधिवेशननिहाय यादी
सन २०१५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात आश्वासन पुर्ततेची विवरणपत्रे
पटलावर ठेवल्यानंतरची स्थिती

| वर्ष (१) | अधिवेशन (२) | दिलेली आश्वासने (३) | एकुण (४) | निकाली आश्वासने (५) | एकुण (६) | प्रलंबित आश्वासने (७) | एकुण (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९१ | पहिले | ४७२ | | ४७० | | २ | |
| | दुसरे | ५८४ | | ५८४ | | ० | |
| | तिसरे | ३८२ | | ३८२ | | ० | |
| | | | १४३८ | | १४३६ | | २ |
| १९९२ | पहिले | ५६८ | | ५६८ | | ० | |
| | दुसरे | ४३३ | | ४३३ | | ० | |
| | तिसरे | १७३ | | १७३ | | ० | |
| | | | ११७४ | | ११७४ | | ० |
| १९९३ | पहिले | ८४७ | | ८४६ | | १ | |
| | दुसरे | ५४३ | | ५४२ | | १ | |
| | तिसरे | ६९० | | ६८७ | | ३ | |
| | | | २०८० | | २०७५ | | ५ |
| १९९४ | पहिले | १४७७ | | १४७५ | | २ | |
| | दुसरे | ९१५ | | ९१४ | | १ | |
| | तिसरे | ४४५ | | ४४४ | | १ | |
| | | | २८३७ | | २८३३ | | ४ |
| १९९५ | पहिले | २८२ | | २८२ | | ० | |
| | दुसरे | ११८९ | | ११८८ | | १ | |
| | तिसरे | ९९४ | | ९९४ | | ० | |
| | | | २४६५ | | २४६४ | | १ |
| १९९६ | पहिले | ४१२ | | ४११ | | १ | |
| | दुसरे | ७०४ | | ७०३ | | १ | |
| | तिसरे | ४७७ | | ४७७ | | ० | |
| | | | १५९३ | | १५९१ | | २ |
| १९९७ | पहिले | ४८६ | | ४८६ | | ० | |
| | दुसरे | १४८ | | १४८ | | ० | |
| | तिसरे | २८० | | २७७ | | ३ | |
| | | | ९१४ | | ९११ | | ३ |
| १९९८ | पहिले | ६२६ | | ६२६ | | ० | |
| | दुसरे | २६९ | | २६९ | | ० | |
| | तिसरे | ३०६ | | ३०६ | | ० | |
| | | | १२०१ | | १२०१ | | ० |
| १९९९ | दुसरे | ५३५ | | ५३३ | | २ | |
| | चौथे | ५०८ | | ५०६ | | २ | |
| | | | १०४३ | | १०३९ | | ४ |
| २००० | पहिले | ९६५ | | ९६४ | | १ | |
| | दुसरे | १८० | | १८० | | ० | |
| | तिसरे | २६२ | | २६१ | | १ | |
| | | | १४०७ | | १४०५ | | २ |

प्रलंबित आश्वासनांची वर्षानिहाय व अधिवेशननिहाय यादी--- चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००१ | पहिले | ३०९ | | ३०९ | | ० | |
| | दुसरे | ३४५ | | ३४४ | | १ | |
| | तिसरे | २७४ | | २७४ | | ० | |
| | | | ९२८ | | ९२७ | | १ |
| २००२ | पहिले | ५१९ | | ५१५ | | ४ | |
| | तिसरे | ३४२ | | ३३९ | | ३ | |
| | चौथे | ४१९ | | ४१७ | | २ | |
| | | | १२८० | | १२७१ | | ९ |
| २००३ | दुसरे | ६८९ | | ६८० | | ९ | |
| | चौथे | ७३६ | | ७२४ | | १२ | |
| | पाचवे | ७०१ | | ७०० | | १ | |
| | | | २१२६ | | २१०४ | | २२ |
| २००४ | पहिले | ४१ | | ३९ | | २ | |
| | दुसरे | ६४१ | | ६२९ | | १२ | |
| | चौथे | ५२२ | | ५१३ | | ९ | |
| | | | १२०४ | | ११८१ | | २३ |
| २००५ | पहिले | १३५७ | | १३५२ | | ५ | |
| | दुसरे | ११३५ | | ११२३ | | १२ | |
| | तिसरे | ७१३ | | ७१० | | ३ | |
| | | | ३२०५ | | ३१८५ | | २० |
| २००६ | पहिले | १३०४ | | १२८० | | २४ | |
| | दुसरे | ६७३ | | ६६२ | | ११ | |
| | तिसरे | ९०४ | | ८८८ | | १६ | |
| | | | २८८१ | | २८३० | | ५१ |
| २००७ | पहिले | १३८९ | | १३६७ | | २२ | |
| | दुसरे | ७५७ | | ७४४ | | १३ | |
| | तिसरे | ५३३ | | ५१९ | | १४ | |
| | | | २६७९ | | २६३० | | ४९ |
| २००८ | पहिले | ९८३ | | ९५७ | | २६ | |
| | दुसरे | १७७ | | १७५ | | २ | |
| | तिसरे | ३५३ | | ३३५ | | १८ | |
| | | | १५१३ | | १४६७ | | ४६ |
| २००९ | पहिले | २२ | | २१ | | १ | |
| | दुसरे | ४८४ | | ४६७ | | १७ | |
| | तिसरे | १ | | १ | | ० | |
| | चौथे | ३१९ | | ३१२ | | ७ | |
| | | | ८२६ | | ८०१ | | २५ |
| २०१० | पहिले | १३२५ | | १२५२ | | ७३ | |
| | दुसरे | ५८० | | ५३४ | | ४६ | |
| | तिसरे | ५८२ | | ५२३ | | ५९ | |
| | | | २४८७ | | २३०९ | | १७८ |
| २०११ | पहिले | ९८१ | | ९१६ | | ६५ | |
| | दुसरे | ३४१ | | ३२३ | | १८ | |
| | तिसरे | २३४ | | २१३ | | २१ | |
| | | | १५५६ | | १४५२ | | १०४ |

## प्रलंबित आश्वासनांची वर्षनिहाय व अधिवेशननिहाय यादी--- चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१२ | पहिले | ८६१ | | ७७९ | | ८२ | |
| | दुसरे | ४९५ | | ४३७ | | ५८ | |
| | तिसरे | ४२२ | | ३७६ | | ४६ | |
| | | | १७७८ | | १५९२ | | १८६ |
| २०१३ | पहिले | ५५७ | | ४६६ | | ९१ | |
| | दुसरे | ४५१ | | ३१९ | | १३२ | |
| | तिसरे | ३८८ | | २४५ | | १४३ | |
| | | | १३९६ | | १०३० | | ३६६ |
| २०१४ | पहिले | ५७ | | ३२ | | २५ | |
| | दुसरे | ४६० | | २०९ | | २५१ | |
| | तिसरे (विशेष) | ७ | | ५ | | २ | |
| | चौथे (हिवाळी) | ८२२ | | १५९ | | ६६३ | |
| | | | १३४६ | | ४०५ | | ९४१ |
| २०१५ | पहिले | ११८९ | ११८९ | ८ | ८ | ११८१ | ११८१ |
| | एकूण .. | | ४२५४६ | | ३९३२१ | | ३२२५ |

## (१) अभिप्राय-शिफारशी

विधानसभा सभागृहात विविध संसदीय आयुधांद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेला उत्तर देतांना मा. मंत्री महोदयांकडून आश्वासने, अभिवचने दिली जातात. सभागृहात दिलेल्या सदर आश्वासनांची पूर्तता शासनाने ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे. तथापि, बहुतेक प्रकरणात आश्वासनाच्या पूर्ततेसाठी सदर विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागत असल्याची बाब समितीने आपल्या अहवालांद्वारे यापूर्वी वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली असूनही त्यामध्ये फारशी सुधारणा झाल्याचे समितीला आढळून येत नाही.

**अत: समिती शिफारस करते की, शासनाद्वारे देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता कटाक्षाने ९० दिवसात करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीस कळविण्यात यावा.**

आश्वासनांवर केलेल्या कार्यवाहीची सभागृहाच्या पटलावर विलंबाने ठेवणे ही समितीसमोरील एक मोठी समस्या आहे. सदर विवरणपत्रे विलंबाने पटलावर ठेवल्यामुळे संबंधित आश्वासने विषय कालबाह्य झाल्याने विचारात घेणे समितीला शक्य होत नाही, परिणामी समितीच्या कामकाजात विस्कळीतता येते.

**अत: समिती अशी शिफारस करते की, सभागृहात आश्वासन देण्यात आल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत त्यानंतर येणाऱ्या लगतच्या अधिवेशनामध्ये आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे पटलावर ठेवण्यात यावीत. आश्वासनांची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर विहित कालावधीपेक्षा विलंबाने ठेवणाऱ्या संबंधित मंत्रालयीन विभागाच्या उप सचिव अथवा त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यावर विलंबाची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

आधुनिक काळात दळणवळणाची आणि संपर्काची विविध साधने सर्व स्तरांवर उपलब्ध असून अशा साधनांचा वापर मंत्रालयीन विभागाने पुरेपुर घ्यावा व सर्व प्रलंबित आश्वासनांची पूर्तता विनाविलंब करावी. समिती अशी शिफारस करते की, शासनामार्फत वेळोवेळी पटलावर ठेवण्यात येणाऱ्या वर्षनिहाय व अधिवेशननिहाय **आश्वासनांबाबतच्या कार्यवाही पूर्ततेची विवरणपत्रासह माहिती CD (Compact Disc) स्वरूपात यापुढे प्रत्येक वेळी समितीला पुरविण्यात यावी.**

**समिती अशीही शिफारस करते की, सदर अहवालात समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने, सदर अहवाल संबंधित मंत्रालयीन विभागाला प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत उक्त आश्वासनावर कार्यवाही करून व त्याची पूर्तता करून त्याबाबतची माहिती समितीला तात्काळ पाठविण्यात यावी.**

आश्वासनांच्या पूर्तीबाबत मंत्रालयीन विभागांकडून समितीपुढे ठेवण्यासाठी पाठविण्यात येणाऱ्या विवरणपत्रात आश्वासनाचा विषय मंत्री/राज्यमंत्री महोदयांकडून सभागृहात देण्यात आलेले आश्वासन व करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा विभागाने केलेला उल्लेख यामध्ये बऱ्याच प्रकरणी विसंगती असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. अशाप्रकारे समितीला गृहित धरुन समितीची दिशाभूल करण्याची विभागांची प्रवृत्ती उचित नाही. या बाबीची समितीने गांभिर्याने दखल घेतली असून यापुढे असे प्रकार आढळून येणार नाहीत, याबाबत मुख्य सचिवांनीही सर्व विभागीय सचिवांना आवश्यक त्या सुचना द्यावेत असे समितीने निदेश दिले होते. त्यानुषंगाने मा. मुख्य सचिव यांच्या स्तरावरुन सर्व विभागीय सचिवांना दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये योग्य त्या सुचना व निदेश दिले आहेत.

## (२) समितीचा विशेष अभिप्राय व शिफारशी

### महसूल व वन (वने) विभाग

**विधानसभा आश्वासन क्रमांक ३६७, विधानसभा कामकाज खंड क्र. १५६, पृष्ठ क्र. १४**

**"अलिबाग, जिल्हा रायगड येथील शेतकऱ्यांच्या वंशपरंपरागत जमिनीत खारे पाणी शिरल्याबाबत"**

श्रीमती मिनाक्षी पाटील व इतर वि. स. स. यांनी दिलेली दिनांक २ ऑगस्ट, २०१३ रोजी विधानसभेत "अलिबाग जि. रायगड येथील शेतकऱ्यांच्या वंशपरंपरागत जमिनीत खारे पाणी शिरल्याबाबत" या विषयावर लक्षवेधी सूचनेद्वारे चर्चा उपस्थित केली असता चर्चेच्या अनुषंगाने मा. महसूल मंत्री यांनी या संदर्भातील मा. वन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक ऑगस्ट महिन्यामध्ये घेण्यात येईल" असे आश्वासन दिले होते.

(१) **आश्वासनांची पार्श्वभूमी :** " रायगड जिल्ह्यातील विशेषत: अलिबाग तालुक्यातील खाडी किनारी असलेल्या भात पिकाखालील जमिनीची वंशपरंपरागत शेतकऱ्यांच्या नावे ७/१२ दप्तरी सरकारी नोंद असणे, शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या खारभूमी योजना अपुऱ्या निधीमुळे पूर्ण होत नसल्याने भातपिकाखालील जमिनीत खारे पाणी शिरून जमिनीच्या बाधित क्षेत्रात वाढ होणे, समुद्राच्या मोठ्या उधाणामुळे पाण्यात मँग्रोजचे बीज वाहत येऊन शेतीमध्ये रुजणे, सदर भात पिकाखालील जमिनी पूर्वापार शेतजमिनी असल्याबाबत शासन दरबारी नोंद असतानाही एन. जी. ओ. मार्फत अप्रत्यक्ष पाहणी अहवालानुसार भातपिकाखालील जमिनी मँग्रोजयुक्त असल्याचा अहवाल सादर करून शासनाची फसवणूक करणे, जमीन लागवडीखाली आणताना अकस्मात उगवलेले मँग्रोज शेतकऱ्यांनी नष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही व फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणे, केवळ शासनाच्या योजना विहित कालावधीमध्ये पूर्ण होत नसल्याने मोठ्या उधाणाच्या वेळी वाहत आलेले मँग्रोजचे बीज उगवणे ही नैसर्गिक बाब असल्याने याबाबत शासनाने शासन दरबारी असलेल्या नोंदी तपासल्या खेरीज कारवाई न करण्याची आवश्यकता, शासनाच्या संबंधीत विभागाकडून आवश्यक निधी उपलब्ध होत नसल्याने मंजूर खारभूमी योजना व बाहेर काठा यांना मोठ्या प्रमाणावर खाडी जात असल्याने भातपिकाखालील जमिनीचे नुकसान होत राहणे, यासाठी नैसर्गिकरित्या उगवलेल्या मँग्रोजसंबंधी शेतकऱ्यांच्या ७/१२ ची खात्री केल्याखेरीज कोणतीही दंडात्मक अथवा फौजदारी कारवाई करू नये अशी शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, यामुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." या मुद्यासंदर्भात श्रीमती मिनाक्षी पाटील व इतर विधानसभा सदस्यांनी लक्षवेधीद्वारे सभागृहात विषय उपस्थित केला होता.

सभागृहामध्ये लक्षवेधी सुचनेवर चर्चा चालू असताना मा. मंत्री महोदयांनी सादर केलेल्या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये शासनाने मान्य केलेले आहे की, शासनाकडून वेळीच दुरूस्ती न झाल्यामुळे शेतामध्ये खारे पाणी शिरुन शेतजमीन नापीक झालेली आहे. शेतकऱ्यांची हजारो हेक्टर जमीन नापीक झालेली आहे. आमच्या जमिनीवर मॅन्ग्रोव्हज उगवलेली आहे. कोण कुठली एनजीओ येते आणि म्हणते की, येथे वनक्षेत्र लावा आमचे शेतकरी यामुळे मोठया प्रमाणावर विस्थापित झालेले आहेत. शासनाच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांची हजारो हेक्टर जमीन नापीक झालेली आहे. त्यांना त्या जमिनीमध्ये पुन्हा पीक लावता येत नाही. शासन याबाबत योग्य तो विचार करून महसूल व वन विभागाच्या समन्वयातून चांगला मार्ग काढू शकते असे आपले मत मांडल्यानंतर मा.महसूल मंत्री यांनी उच्च न्यायालयाने या संदर्भात एका रिट पिटीशनसंदर्भात जे आदेश दिले, त्या आदेशानुसार शासनाच्या परिपत्रकान्वये यासंदर्भातील जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर सूचना देण्यात आल्या. जमाबंदी आयुक्तांना त्या सर्वेक्षणाची नोंद संबंधित शेतकऱ्यांच्या सात/बारा वर घ्यावी अशा सूचना होती. यामध्ये काही कायदेशीर प्रश्न निर्माण झालेले आहेत. या संदर्भात मा. वन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकीमध्ये महसूल व वन विभागाचे अधिकारीही उपस्थित असतील. यासंबंधी जे काही रिट व निर्देश उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. यासंबंधीच्या अंमलबजावणीमध्ये जर काही दोष राहत असतील तर यासंदर्भात पुन्हा रिट पिटीशन करुन सुप्रीम कोर्टात जाता या संदर्भात या बैठकीमध्ये चर्चा करण्यात येईल. शेतकऱ्यांना न्याय देणारे धोरण निश्चितपणे शासनाच्या माध्यमातून आखले जाईल. तसेच या संदर्भातील बैठक ऑगस्ट महिन्यामध्ये घेण्यात येईल असे मा. महसूल मंत्र्यांनी आश्वासन दिले.

(२) **विभागाने आश्वासनावर केलेली कार्यवाही:** उपरोक्त आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी विभागाकडे पाठविले असता विभागाकडून यासंदर्भात दिनांक २७ ऑगस्ट,२०१३ रोजी मा.मंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन निर्णय घेण्यात आला की, खारभूमी बंधाऱ्यांची वेळीच दुरुस्ती होत नसल्यामुळे पुर्वीपासून शेती खाली असलेल्या जमिनीत मोठया उधानाच्या वेळी वाहुन आलेल्या मॅंग्रोव्ह बीजामुळे तयार झालेली खारफुटी हो मुळीच नैसर्गिक मॅंग्रोव्ह राहत नसल्याने असे क्षेत्र "वने" म्हणून अधिसूचित करणे योग्य ठरणार नाही. तसे केल्यास गोर-गरीब शेतकऱ्यांवर अन्याय होणार व मॅंग्रोव्ह वनस्पती प्रती लोकांमध्ये रोष निर्माण होईल. ही सर्व बाब शासन मान्यतेने मा.उच्च न्यायालयाने निदर्शनास आणून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून पुढील कार्यवाही करता येईल

लोक प्रतिनिधींनी सभेत असेही निदर्शनास आणले की, काही प्रकरणी कांदळवने नसतांनाही खाजगी क्षेत्र मॅंग्रोव्ह (वने) म्हणून अधिसूचित करण्यात आले आहेत. तथापि, तत्पूर्वी संबंधित जमीन मालकांचे म्हणणे विचारात घेण्यात आलेले नाही. यावर तोडगा काढण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली भूमी अभिलेख व इतर संबंधित अधिकाऱ्यांची एक समिती तयार करुन बाधित व्यक्तींचे म्हणणे ऐकून व जमिनीच्या प्रत्यक्ष परिस्थितीचा अंदाज घेऊन त्यानुसार मॅंग्रोव्ह संदर्भात अंतिम अधिसूचना निर्गमित करता येईल. तथापि, तत्पुर्वी याबाबत शासनाची औपचारिक मान्यता प्राप्त करून उपरोक्त समिती गठित करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाची रितसर परवानगी प्राप्त करण्यासाठी मा.उच्च न्यायालयात आवश्यकतेनुसार प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात यावे.

(३) **विभागीय सचिवांची साक्षः** आश्वासनाचा विषय महत्वाचा असल्याने समितीने दिनांक ३० जून,२०१५ रोजी विभागीय सचिवाची साक्ष घेतली. समितीने आश्वासानाबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या सद्यः स्थितीच्या माहितीबाबत विचारणा केली असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी असे नमूद केले की, शासकीय जमिनीवर मॅंग्रोव्हज संरक्षित वन तर खाजगी क्षेत्रावरील मॅंग्रोव्हज वने म्हणून अधिसूचित करावयाचे आहे. मात्र शासनाने शासकीय जमिनीवरील मॅंग्रोव्हज संरक्षित वन ऐवजी राखीव वन म्हणून घोषित करण्याचे निर्णय घेतले आहे. त्यानुसार आतापर्यंत शासकीय जमिनीवरील ५४७१.४६४ क्षेत्र भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम ४ अन्वये राखीव वन म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे. तर २६६२.३० हेक्टर आर क्षेत्र राखीव वन म्हणून घोषित करण्यास अंतरिम शासनाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मुंबई उपनगर येथील १७७४.८४ हे. आर खाजगी क्षेत्र वने म्हणून अधिसूचित करण्यात आले असून ५.४० हे. आर क्षेत्र वने म्हणून घोषित शासनाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे. खाजगी क्षेत्रावरील मॅंग्रोव्ह वने म्हणून घोषित करण्यासाठी दोन टप्प्यातून अधिसूचना काढण्याबाबत विचार सुरु आहे. प्रथम टप्प्यात नोटिफिकेशन ऑफ इंटेन्शन तर दुस-या टप्प्यात फायनल नोटिफिकेशन काढणे प्रस्तावित आहे असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

यावर मा. सदस्यांनी वन या संज्ञेमध्ये वन किंवा शेतीशी संबंधीतच काम करता येते. ही जमीन विकासाच्या प्रयोजनाकरीता वापरता येत नाही अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी या संदर्भात खाजगी व शासकीय जमिनीमध्ये मॅंग्रोव्हज म्हणून घोषित करण्याकरीता, तसेच, यामध्ये कोणावरही अन्याय होता कामा नये याकरिता जिल्हाधिकाऱ्यांकडे आक्षेप नोंदविण्याची तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे. यासंदर्भातील संदिग्ध केसची सुनावणी जिल्हाधिकारी यांचेकडे घेऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल असे समितीला सांगितले. उपरोक्त संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा असे अभिप्राय देवून आश्वासन मान्य केले.

**अभिप्राय व शिफारशी :----**

" अलिबाग, जिल्हा-रायगड येथील शेतकऱ्यांच्या वंशपरंपरागत जमिनीत खारे पाणी शिरल्याबाबत " या विषयावरील लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या अनुषंगाने मा. महसूल मंत्री यांनी " ज्या संदर्भातील मा. वन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक ऑगस्ट महिन्यामध्ये घेण्यात येईल " असे आश्वासन दिले आहे.

विभागीय सचिवानी साक्षीच्या वेळी नमूद केले की, शासकीय जमिनीवर मॅंग्रोव्हज संरक्षित वन तर खाजगी क्षेत्रावरील मॅंग्रोव्हज वने म्हणून अधिसूचित करावयाचे आहे. मात्र शासनाने शासकीय जमिनीवरील मॅंग्रोव्हज संरक्षित वन ऐवजी राखीव वन म्हणून घोषित करण्याचे निर्णय घेतले. त्यानुसार आतापर्यंत शासकीय जमिनीवरील ५४७१.४६४ क्षेत्र भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम ४ अन्वये राखीव वन म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे. तर २६६२.३० हेक्टर आर क्षेत्र राखीव वन म्हणून घोषित करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मुंबई उपनगर येथील १७७४.८४ हे. आर खाजगी क्षेत्र वने म्हणून अधिसूचित करण्यात आले असून ५.४० हे. आर क्षेत्र वने म्हणून शासनाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे. खाजगी क्षेत्रावरील मॅंग्रोव्ह वने म्हणून घोषित करण्यासाठी दोन टप्प्यातून अधिसूचना काढण्याबाबत विचार सुरु आहे या संदर्भात खाजगी व शासकीय जमिनीमध्ये मॅंग्रोव्हज म्हणून घोषित करण्याकरीता, तसेच यामध्ये कोणावरही अन्याय होता कामा नये या करिता जिल्हाधिकाऱ्यांकडे आक्षेप नोंदविण्याची तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे.

**याबाबत समिती अशी शिफारस करते की, उपरोक्त प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी.**

## वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग

विधानसभा आश्वासन क्रमांक ६० व ६२, विधानसभा कामकाज खंड १६६,पृष्ठ क्रमांक५, दिनांक २२ जुलै,२०१३.

"कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिला राजे रूग्णालयातील सी. टी. स्कॅन मशीन बंद असल्याबाबत"

श्री. राजेश क्षीरसागर व इतर. वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १११२९९ ला उत्तर देताना मा.वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये मंत्री यांनी "सदरहू मशिनची मुदत संपलेली असल्याने आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून नवीन सीटी स्कॅन व एमआरआय मशिन सदरहू रूग्णालयात लवकरच बसविण्यात येणार आहे. तसेच लवकरच ती पदे भरून कार्डियाक युनिट पूर्ववत चांगल्या रितीने सुरु होईल" असे आश्वासन दिले होते.

१) विभागाने आश्वासनावर केलेली कारवाई- विभागाकडून आश्वासनाच्या पूर्ततेबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर यांचेशी संलग्नित छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर यां संस्थेत हृदयरोगशस्त्रक्रिया (सी.व्ही.टी.एस.) विभागासाठी २७, हृदयरोगचिकित्सा (कार्डियोलॉजी) विभागासाठी २५ व रक्तपेढी (अॅफेरेसिस) विभागासाठी १७ अशी एकूण ६९ पदे निर्माण करण्यास व चतुर्थश्रेणी पदांची कामे बाह्ययंत्रणेद्वारे (out sourcing) करून घेण्याच्या प्रस्तावास मंत्रीमंडळाने मान्यता दिल्यानंतर दिनांक ०३ मार्च, २०१४ रोजी पदनिर्मितीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

२) विभागीय सचिवांची साक्ष- आश्वासनाचा विषय महत्वाचा व जिव्हाळयाचा असल्याने समितीने दिनांक १७ नोव्हेंबर,२०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने आश्वासनाबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या सद्य:स्थितीच्या माहितीबाबत विचारणा केली असता, या संदर्भात विभागाने सद्य:स्थितीच्या विवरणामध्ये नमुद केलेले आहे की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेकरीता १२८ स्लईस सीटी स्कॅन मशीन खरेदीसाठी सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात अनुदान मंजूर झाले असून शासनस्तरावरुन प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. ई-निविदा व्दारे खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत असून त्याचा प्रस्ताव सचिव स्तरावरील राज्य स्तरीय खरेदी समितीच्या बैठकीत ठेवण्यात येणार आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेतील कार्डीओलॉजी व सीव्हीटीएस या विभागातील मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे यांची माहिती सोबत जोडलेली आहे. कार्डीओलॉजी विभागात जानेवारी ते ऑक्टोबर २०१५ या कालावधीत ५७ प्रोसिजर्स झाल्या आहेत. सीव्हीटीएस विभागात जानेवारी ते ऑक्टोबर २०१५ या कालावधीत १८ शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. ६५ मेजर व मायनर शस्त्रक्रिया झालेल्या आहेत एकूण आंतररुग्ण २३७-१२८ (दुसऱ्या वार्डस्मधील स्थलांतरीत रुग्ण) अशा प्रकारे कार्डीयाक युनिट चांगल्या प्रकारे सुरू झाले आहे.

### संस्थेचे नांव:- राजश्री छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रूग्णालय कोल्हापूर

C.V.T.S. विभाग

| अ.क्र | पद | मंजूर | भरलेली | रिक्त | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | ० | ० | ० | |
| २ | सहयोगी प्राध्यापक | १ | ० | १ | |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक | ४ | ४ | १ | |
| ४ | वरिष्ठ निवासी | ० | ० | ० | |
| ५ | कनिष्ठ निवासी | ० | ० | ० | |
| ६ | तंत्रज्ञ | ० | ० | ० | |
| ७ | परफयुजनिस्ट (Perfusionist) | ० | ० | ० | |

Cardiology विभाग

| अ.क्र | पद | मंजूर | भरलेली | रिक्त | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ८ | प्राध्यापक | १ | ० | १ | |
| ९ | सहयोगी प्राध्यापक | १ | ० | १ | |
| १० | सहाय्यक प्राध्यापक | ४ | २ | २ | |
| ११ | वरिष्ठ निवासी | ० | ० | ० | |
| १२ | कनिष्ठ निवासी | ० | ० | ० | |
| १३ | तंत्रज्ञ | १ | ० | १ | |
| १४ | परफयुजनिस्ट | १ | ० | १ | |

विभागीय सचिवांनी असे सांगितले की,१२८ सिटी स्कॅन मशीन खरेदी करण्याची प्रक्रिया चालू आहे, आपणास त्याकरिता अनुदानसुध्दा मिळालेले आहे. ई-टेंडर फ्लोट केलेले आहे. लवकरात लवकर याची कार्यवाही पूर्ण होईल.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, २०१३ च्या अधिवेशनातील हा विषय आहे. त्याची प्रक्रिया २०१५ मध्येही पूर्ण झालेली नाही. शासनाने दिलेल्या आश्वासनाची तीन महिन्यात पूर्तता केली पाहिजे. आश्वासनावर पुन्हा आश्वासने दिली जात आहेत. जनतेच्या आरोग्यासंबंधी असल्यामुळे ही सिरीयस बाब आहे. कोल्हापूरला सिटी स्कॅन होत नसेल तर पुण्याला यावे लागते, पुणे नंतर मुंबईला यावे लागते. खेडयातील माणूस प्रायव्हेट हॉस्पीटलमध्ये सिटीस्कॅन करु शकत नाही. आता १२८ सिटी स्कॅन मशीनची प्रोसेस कोठपर्यंत आली आहे ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की,टेंडर प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. दोन महिन्यात ऑर्डर प्लेस होईल.

यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, याकरिता उशीर होण्याचे कारण काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की,ज्या कंपनीचे पूर्वी सिटी स्कॅन मशीन होते. सुरुवातीस त्यांनी सांगितले की, आम्ही दुरुस्त करुन देऊ. त्यांच्याबरोबर करार करण्यात आला होता. मशीन सुरु केल्यानंतर चार दिवसात पुन्हा ते बंद पडले. कंपनीने सांगितले की, हे मॉडेल आऊट डेटेड झाले आहे. या मॉडेलचे उत्पादन बंद झालेले आहे. १० वर्ष आऊटडेटेड मशीनचा जोपर्यंत आपण मेंटेशन करण्याचे प्रमाण पत्र येत नाही तोपर्यंत ते निर्लेखित करता येत नाही. यामध्ये निर्लेखित करण्याची प्रक्रिया आम्ही केली. त्यानंतर आम्ही नवीन मशीनची प्रक्रिया केली आहे. उत्तर देताना आपण असे म्हटले आहे की, २७ हृदयचिकित्सा आणि २५ अस्थीव्यंगोपचार विभागासाठी, अशी एकूण ६९ पदे निर्माण करण्याची मान्यता दिलेली आहे. मुळ उत्तराचा आणि याचा आम्हाला ताळमेळ समजत नाही.

यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, आश्वासन सिटी स्कॅन मशीन बाबत आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. यावर आपण उत्तर दिले आहे की, लवकरच ही पदे भरण्यात येतील. आता सिटी स्कॅन व या पदांचा संबंध मला समजत नाही.

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सिटी स्कॅनबाबत जेव्हा चर्चा चालली होती, तेव्हा आश्वासन देण्यात आले होते. त्यावर उपप्रश्न विचारण्यात आला होता. कोल्हापूरमध्ये त्याच रुग्णालयात शस्त्रक्रिया विभाग चांगल्या प्रकारे कार्यान्वीत नाही. यावर उत्तर देताना मंत्री महोदयांनी सांगितले की, या हृदय शस्त्रक्रिया विभागासाठी कोल्हापूर येथे खास पदे मंजूर करीत आहोत. ही पदे भरल्यानंतर हृदय शस्त्रक्रीया विभाग चांगल्या प्रकारे सुरु होईल. यातील जेवढी माणसे आम्हाला मिळाली तेवढी पदे भरली आहेत. परंतु अद्यापही प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पात्रतेच्या व्यक्ती मिळत नाहीत.तसेच या पात्रतेची माणसे मिळत नसल्यामुळे २ पदे रिक्त राहिली आहेत. ६९ पदापैकी ५५ पदे भरली आहेत. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकाची दोन पदे फक्त राहिली आहेत. कारण त्या पात्रता व अनुभवाची माणसे आम्हाला मिळाली नाहीत.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, कोल्हापूरमध्ये पात्र उमेदवार मिळाले नाही तर बाहेरुन भरु शकता. हा प्रश्न केवळ कोल्हापूरचा नसून प्रत्येक ठिकाणी जेथे सिटीस्कॅन आहे तेथील पदांचा प्रश्न आहे. सिटी स्कॅन मशीन बंद झाल्यानंतर महिनाभर मशीन सुरु होत नाही. अकोला येथेही अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. महिन्यानंतर मुंबईहून टेक्नीशियन येतो व दुरुस्ती केली जाते. यासाठी काही उपाययोजना करावी. रिक्त पदांचा प्रश्न वेगळा आहे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, कंपनीबरोबर आमचा मशीन मेंटेनन्स व रिपेअर्सचा करार झालेला असतो. कराराप्रमाणे कंपनीचे इंजिनियर्स येतात. मशीनचा एखादा पार्ट खराब झाल्यास जर्मनीवरुन आणावा लागतो, त्यामुळे मशीन सुरु होण्यास महिनाभर उशीर होतो. पहिली पाच वर्षे आपण कॉम्प्रेहेन्सीव्ह करार करतो.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, कराराप्रमाणे २४ तासाच्या आत त्यांना रिपेअर करावे लागते. त्याला एएमसी म्हणता येत नाही ते ऑन कॉल आहे. एमएमसीचा अर्थ असा आहे की, त्यांच्याकडे ते पार्ट असतात. त्यांनी २४ तासात ते मशीन रिपेअर केले पाहिजे, असा नियम आहे. राज्यभर या मशीनचा प्रश्न आहे. इक्वीपमेंट कॉस्टच्या ८ ते १० टक्के ही एएमसी कॉस्ट असते. आपण ५-६ टक्के जास्त रक्कम अशाकरिता देतो की, २४ तासाच्या आत दुरुस्तीची सेवा मिळाली पाहिजे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, प्रत्येक मशीनकरिता आपण एएमसी केलेले आहे. हे सार्वजनिक आरोग्य विभागाचे मशीन असले तरी आम्ही कोणताही भेदभाव न करता एएमसी केलेले आहे. त्यातून आम्ही तपासून बघतो की, कोठे उशिर झालेला आहे. चुकांची पुनरावृत्ती होऊ नये याची आम्ही दक्षता घेत आहोत.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, या मशीन भारतात तयार होतात की, बाहेरुन मागविल्या जातात ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या मशीन परदेशातून आयात केल्या जातात. या इम्पॉर्टेड मशीन आहेत.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, आता एवढी काळजी घ्यावी की लवकरात लवकर झाले पाहिजे. माझा एक अॅकेडेमीक प्रश्न आहे. आपल्याकडे डॉक्टरांकरिता प्रॅक्टीसिंग अॅंड नॉन प्रॅक्टीसिंग अलाऊन्स असतो. तुमच्या विभागाकडील हॉस्पीटलमधील लेक्चलर बोर्ड लावून प्रॅक्टीस करीत आहेत. त्यालाही आमची हरकत नाही पण विभागाकडून मिळणारा पगार व त्यांची कमाई याची तफावत पाहता माणसे मिळत नाहीत. किमान त्यांनी शासनाच्या हॉस्पीटलच्या डयुटी टाईममध्येतरी आले पाहिजे. या करिता बायोमॅट्रीक वगैरे घेता येईल का ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आपण बायोमॅट्रीक केले आहे व आता जास्त प्रमाणात एन्फोर्स करु.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, अकोला येथे हॉस्पीटलची खूप वाईट परिस्थिती आहे. मध्यंतरी आपण ऑनररी लेक्चरर्स घेत होतो. मेडीकल कौन्सिलचा नियम आहे की, तुम्ही ऑन कॉल कोणाला बोलावले तर ते तुमचे कर्मचारी असतील किंवा नसतील तरीही त्यांनी आठ तासामध्ये येऊन सर्विस दिली पाहिजे. कारण अशा सर्जनला शासन रक्कम अदा करते. तातडीच्या रुग्णांच्या केसेसमध्ये असे काही करता येईल का ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आता माझ्याकडे याची माहिती नाही. मी माहिती घेऊन सांगते.

सर, आपण १० वर्ष झालेल्या लोकांची फाईल म्हणता. त्या फाईलची प्रोसेस आम्ही सुरु केलेली आहे. त्याच्या अगोदरची एक फाईल आहे. त्यावरील प्रक्रिया सुरु केलेली नाही. ७७८ लोकांची फाईल आहे. त्यानंतर या फाईलचा नंबर येणार आहे. ऑनररीबद्दल आपण विचारले. ती प्रक्रिया अद्याप चालू आहे. जवळपास २०० ऑनररी आहेत. त्यांचे मानधन ३५ वर्षापूर्वी १५०० रुपये फिक्स केले होते.

अभिप्राय व शिफारशी :

(१) "कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिला राजे रूग्णालयातील सी. टी. स्कॅन व एमआरआय मशिनची मुदत संपलेली असल्याने आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून नवीन सीटी स्कॅन व एमआरआय मशिन लवकरच बसविण्यात येणार आहे तसेच सदर रूग्णालयातील रिक्त पदे भरून कार्डियाक युनिट पूर्ववत चांगल्या रितीने सुरु होईल" असे आश्वासन मा. मंत्रीमहोदयांनी माहे जुलै, २०१३ मध्ये सभागृहात आश्वासन दिले आहे.

विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी १२८ सिटी स्कॅन मशिन खरेदी करण्याची प्रक्रिया चालू असून त्याकरिता अनुदानही मिळालेले आहे. तसेच ई- टेंडर फ्लोट केलेले असून लवकरात लवकर याची कार्यवाही पूर्ण होईल असे स्पष्टीकरण दिले. तथापि सन २०१३ च्या अधिवेशनातील हा विषय असून त्याची प्रक्रिया २०१५ मध्येही पूर्ण झालेली नाही याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते. शासनाने सभागृहात दिलेल्या आश्वासनांची तीन महिन्यात पूर्तता केली पाहिजे. आश्वासनावर पुन्हा आश्वासने देणे हे समितीस योग्य वाटत नाही. विषय जनतेच्या आरोग्यासंबंधी असल्यामुळे ही बाब शासनाने गांभीर्याने घेणे आवश्यक आहे.

**याबाबत समिती अशी शिफारस करते की, १२८ सिटी स्कॅन मशीन खरेदी करण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी. तसेच झालेल्या विलंबाबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व संबंधित दोषी व्यक्तींविरूध्द कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावा.**

**(२) छत्रपती प्रमिला राजे रूग्णालयात रिक्त पदे भरली नसल्यामुळे शस्त्रक्रिया विभाग चांगल्या प्रकारे कार्यान्वीत नाही. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे. येथील रूग्णांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने रिक्त पदे त्वरीत भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी अशी समितीचीं शिफारस आहे.**

## (२) विधानसभा आश्वासन क्रमांक १०१, विधानसभा कामकाज खंड १६६, पृ.क्र.६, दिनांक २३ जुलै, २०१३.

"मुंबईतील के.ई.एम.रुग्णालयात हृदयशस्त्रक्रिया करण्याची यंत्रे अपुरी असल्याबाबत" या विषयावरील प्रा. शरद पाटील, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११५३७४ ला उत्तर देताना मा. वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये राज्यमंत्री यांनी "ज्या ज्या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये आहेत, त्या ठिकाणी के.ई.एम. रुग्णालयाप्रमाणे व्यवस्था करता येईल का, याबाबतीत वैद्यकीय शिक्षण विभागाशी चर्चा करुन कार्यवाही करण्यात येईल" असे आश्वासन दिले होते.

(१) **विभागाने आश्वासनावर केलेली कारवाई-** विभागाकडून आश्वासनाच्या पूर्ततेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना माहे नोव्हेंबर २०१३ पासून दुसऱ्या टप्प्यात संपूर्ण राज्यभर सुरू करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या निर्णयान्वये संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबईच्या अधिपत्याखालील १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास संलग्नित रुग्णालयांमध्ये सदरहू योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. हृदयशस्त्रक्रिया हा विभाग अतिविशेषोपचार विभागांतर्गत येत असल्यामुळे सदरच्या सुविधा खालील ४ संस्थांमध्ये उपलब्ध आहेत.

(१) ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समुह रुग्णालये, मुंबई

(२) बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे

(३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

(४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

वरीलप्रमाणे नमूद संस्थांमध्ये अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. त्यामुळे सदर संस्थांमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमधील रुग्णांना याबाबतचे उपचार/सुविधा/शस्त्रक्रिया नियमित स्वरुपात सुरू आहेत. विभागाने केलेल्या कार्यवाहीने समितीचे समाधान न झाल्यामुळे शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती मागविण्याचा निर्णय घेऊन त्यावर विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे समितीने निश्चित केले.

(२) **विभागीय सचिवांची साक्ष-** आश्वासनाचा विषय महत्वाचा व जिव्हाळ्याचा असल्याने समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवाची साक्ष घेतली. समितीने आश्वासनाबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या सद्यःस्थितीच्या माहितीबाबत विचारणा केली असता, यासंदर्भात विभागाने सद्यःस्थितीच्या विवरणामध्ये नमुद केले आहे की, राजीव गांधी जीवनदायी योजना सार्वजनिक आरोग्य विभागाद्वारे संचालित केली जाते. सदर विभागाने सदर योजनेबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या धोरणानुसार/मार्गदर्शक तत्त्वानुसार सदरहू योजना राज्यातील विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये सुरू आहे.

सदरहू योजने अंतर्गत पात्र सर्व रुग्णांवर विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार करण्यात येतात. राजीव गांधी जीवनदायी योजना विभागांतर्गत सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात कार्यान्वित आहे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, मुंबईतील केईम रुग्णालयात हृदय शस्त्रक्रिया करण्याचे यंत्रे अपुरी असल्याबाबतचा विषय आहे. सर, राजीव गांधी जीवनदायी योजना सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित आहे आणि सदर विभागाची योज ा आपण वेळोवेळी निर्गमित करीत आहोत. प्रत्येक मेडिकल कॉलेजमध्ये ही योजना लागू आहे. पुणे, अकोला, सोलापूर, आंबेजोगाई, जेजे, औरंगाबाद, लातूर, य तमाळ आदी १७ ठिकाणी ही योजना लागू केलेली आहे.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, आश्वासन वेगळे आहे. ज्या ज्या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय आहे तेथे केईएम रुग्णालयांप्रमाणे हृदय शस्त्रक्रिया करण्याचे यंत्र उपलब्ध करुन देणे शक्य आहे का?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आपण जेजे, ससून, नागपूर, औरंगाब द आणि कोल्हापूर या ५ ठिकाणी सुरु केलेले आहे आणि मोठया प्रमाणात त्या त्या रिजनमधील लोक येत हृदय शस्त्रक्रियेसाठी येत आहेत आणि मोठया प्रमाणात या ५ ठिकाणी शस्त्रक्रिया होत आहेत.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, उर्वरित मेडिकल कॉलेजमध्ये ही फॅसिली ी उपलब्ध करुन देणार का असा प्रश्न आहे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सध्या या ५ ठिकाणी प्रोफेसर आणि  सोसिएट प्रोफेसरची फुलटाईम पदे मिळालेली नाहीत. कोल्हापूर येथे पदे निर्माण होऊन २ वर्षे झाली तरी आम्हाला प्रोफेसर पदासाठी व्यक्ती मिळत नाही.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, मला काल नांदेड येथे ऑनररी डॉक्टरांचे  ाष्टमंडळ भेटले. ते सेवा द्यायला तयार आहेत. स्व.दिग्विजय खानविलकर हे आरोग्यमंत्री असताना त्यांनी विशेष प्रयत्न करुन पदे निर्माण केली होती.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, कोल्हापूर येथे हार्ट सर्जनची पोस्ट वे लेली असून तेथे त्यांच्याकडून काम सुरु आहे. ऑनररी जे काम करतात त्यांचा ग्रूप वेगळा आहे आणि फुलटाईम काम करतात त्यांचाही ग्रूप आहे.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, आपण ते करण्यापेक्षा संख्याबळ चेंज करा े. सिव्हालमध्ये पेशंट आला तर त्याला सांगितले जाते की, येथे ऑपरेशन होणार नाही. बाजूलाच त्यांचे हॉस्पिटल असते. त्यांचे प्रतिनिधी तेथे फिरत असतात. कट प्रॅक्टिसवर सगळा कार्यक्रम चालतो. आपण सगळया मेडिकल कॉलेजला असे कम्पलशन केले पाहिजे. मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलला तुम्ही जीवनदायी योजना दिलेल ा आहेत त्या ठिकाणी तेवढी भरती होते तर येथे का होत नाही असा विषय डोक्यात आला पाहिजे. चुकीच्या स्टेन वापरली जाते अशा तक्रारी येतात. मेडिकल कॉलेजम ध्ये केले गेले तर आपण त्याला जबाबदार राहू. तुम्ही त्या डॉक्टरला पकडू शकाल, तू हे चुकीचे केले आहेस. रुग्णांची परिस्थिती अशी झाली आहे की त्याला प्रायव्हे टमध्ये जावे लागते. प्रायव्हेटमध्ये आमच्याकडे कॅन्सर हॉस्पिटल आहे. तेथे जीवनदायी योजनेंतर्गत ६-६ वर्षे कोणी येत नाही असे दाखविले जाते. मग हॉस्पिटल कसे चालविले जाते. अजूनही त्यांचे ६०-७० लाख रुपये शिल्लक आहेत.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, तो विषय आम्हाला माहिती आहे. पूर्वी हा विषय सार्वजनिक आरोग्य अंतर्गत होता. आम्ही त्यांना लिहिलेले आहे आणि त्यांच्याबरोबर बसून हा विषय सोडवू. ती योजना बंद झालेली आहे आणि आता त्याचे पैसे देत नाहीत.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, नागपूर आणि अकोला यानंतर मुंबईतील टाटा कॅन्सर हॉस्पिटल येथे उपचार उपलब्ध आहेत. परंतु तेथे लवकर नंबर लागत नाही.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की,ही स्किम बंद झाली त्यावेळचे जे ड्यूज राहिलेले आहेत तेवढे फक्त पेंडिंग आहेत. पब्लिक हेल्थबरोबर चर्चा करुन तो विषय लवकर सोडवू.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, राजीव गांधी जीवनदायी योजना तुमच्या विभागांतर्गत येते की सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येते?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत ाते.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, योजना चालू आहे की, बंद आहे ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, योजना चालू आहे. तशा सूचना आ ही वेळोवेळी डीनला सक्तीने देतो.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, या योजनेत काही खाजगी हॉस्पीटल आहेत. पण ते पेशंटला वेळेवर ट्रीटमेंट देत नाहीत.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या संदर्भात पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट सांगू शकेल.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, मेडिकल कॉलेजला वर्षातून किती  व्हिजीट झाल्या पाहिजेत, अशी काही तरतूद आहे का ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, वर्षाच्या अखेरीस माहे डिसेंबरमध्ये विदर्भाच्या सर्व मेडिकल कॉलेजला व्हिजीट केली जाते.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, मेडिकल कॉलेजला माहे डिसेंबर म हिन्यात अमुक तारखेला भेट देणार आहे असे सांगण्यात येते का ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, अचानक व जिथे कुठे स्ट्राईक सुरु ाला असेल या ठिकाणी भेट दिली जाते.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, मी जेव्हा जे.जे.हॉस्पीटल, मुंबई येथे जातो तिथे खूप चांगली ट्रीटमेंट व औषधी चांगली दिली जाते. पण अकोला येथे सुविधा दिली जात नाही, असे काही आहे का, मुंबईला पैशाचे लोकेशन आहे व पर बेड, पर माणसी जास्त दर असते व जे लहान जिल्हे आहेत तिथे कमी दर असते अशी काही तरतूद आहे का ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, माझ्याकडे सध्या आकडेवा ी नाही.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, माझ्या माहितीप्रमाणे मुंबईला १३६ रु ये व इतर ठिकाणी केवळ १७ रुपये असते.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की. जे.जे.हॉस्पीटल मुंबई येथे स्पेशालिटी आहे त्यामुळे व सन २००६ ला अकोला येथे आले. त्यामुळे २००२ चा जो आंतरचा दहा वर्षाचा अॅव्हरेज आहे त्या बेसेसवर फंड दिला जातो तसेच मेडिकल कॉलेज आल्यापासून जी काही रिक्वायरमेंट वाढली आहे, त्या रिक्वायरमेंटमुळे वाढीव फंड दिला जात नाही. त्यामुळे जे.जे.रुग्णालय व इतर रुग्णालयामध्ये फरक आहे.

यावर मा. समिती प्रमुख यांनी असे सांगीतले की. समितीचा अहवाल विधीमंडळात ज्यावेळेस मांडण्यात येईल त्यावेळेस हा विषय ठेवण्यात यावा.

मा. समिती सदस्यांनी असे सांगितले की, अध्यक्ष महोदय, मी जो माहिती घेतली त्यानुसार जे.जे.रुग्णालय, मुंबई येथे १३६ रुपये पर माणसाला टॅबलेटसाठी पैसे मिळतात, नागपूर येथे ३४ रुपये व अकोलासारख्या जिल्ह्यात आलो तर, १४ रुपये मिळतात. हीच परिस्थिती कोल्हापूर सीपीआर रुग्णालयाची आहे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, २००२ ला जो फंड आला आहे, तो सद्य:स्थितीत मागे पडला आहे. कारण १० वर्षापूर्वीचे जे जुने रेकॉर्ड आहे ते सिव्हिल हॉस्पीटलच्या हिशेबाने सीपीआर रुग्णालय कमी पडते.

अभिप्राय व शिफारशी :

"मुंबईतील के.ई.एम.रुग्णालयात हृदयशस्त्रक्रिया करण्याची यंत्रे अपुरी असल्याबाबत" या विषयावरील प्रा.शरद पाटील, वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ११५३७४ ला उत्तर देताना मा. वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये राज्यमंत्री यानी "ज्या ज्या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये आहेत. त्या ठिकाणी के.ई.एम.रुग्णालयाप्रमाणे व्यवस्था करण्यात येईल का, याबाबतीत वैद्यकीय शिक्षण विभागाशी चर्चा करुन कार्यवाही करण्यात येईल" असे आश्वासन दिले आहे.

विभागीय साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ज्या ज्या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय आहे तेथे केईएम रुग्णालयाप्रमाणे हृदय शस्त्रक्रिया करण्याचे यंत्र उपलब्ध करुन देणे शक्य आहे काय, यावर विभागीय सचिवानी स्पष्ट केले की, जेजे, ससून, नागपूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर या ५ ठिकाणी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत व तेथे शस्त्रक्रिया होत आहेत.

**याबाबत सामीती अशी शिफारस करते की, ज्या ज्या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये आहेत. त्या त्या ठिकाणी के.ई.एम. रुग्णालयाप्रमाणेहृदय शस्त्रक्रियाबाबत यंत्र सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत सादर करावा.**

**(३) विधानसभा आश्वासन क्रमांक १४६, विधानसभा कामकाज खंड १६६, पृष्ठ क्रमांक ७, दिनांक २४ जुलै, २०१३.**

"राज्यात दुधाच्या पिशव्यांवर गुणवत्तेचा ट्रेडमार्क छापणेबाबत" या विषयावरील श्री.अशोक पवार, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०८४४७ ला उत्तर देताना मा.वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये राज्यमंत्री यांनी "अध्यक्ष महोदय, याबाबत निश्चितपणे लक्ष दिले जाईल. तसेच यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीसाठी सविस्तर माहिती सदनाच्या पटलावर ठेवण्यात येईल" असे आश्वासन दिले होते.

**(१) विभागाने आश्वासनावर केलेली कारवाई-** विभागाकडून आश्वासनाच्या पूर्ततेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत दुधाच्या भेसळीच्या प्रकरणी दाखल केलेल्या खटल्यांपैकी १० प्रकरणांमध्ये १५ आरोपींना न्यायालयाने शिक्षा ठोठावली आहे. तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व नियमन २०११ ची अंमलबजावणी ०५ ऑगस्ट, २०११ पासून सुरू झाली आहे. त्याअंतर्गत असुरक्षित घोषित झालेल्या दुधाच्या संदर्भात ४२ खटले न्यायालयात दाखल केले असून, ते सर्व प्रलंबित आहेत. मानदाप्रमाणे नसलेल्या दूध भेसळीच्या प्रकरणांमध्ये १८८ प्रकरणे न्यायनिर्णयाद्वारे निकाली काढले असून रु. ४४,१७,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच १४९ तडजोड प्रकरणी ८,९९,०८५/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा कायद्यातील Packaging and Labeling, Regulation, २०११ in Regulation २.२ relating to "Labeling " (a) in sub regulation २.२.१ after clause ६, the following clause shall be inserted namely :- "(७) License number shall be displayed on the principal display panel in the following format namely :- fssai FSSL १००००००००००००" असे बंधनकारक आहे. आश्वासनावर शासनाने केलेल्या कार्यवाहीवर विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे समितीने निश्चित केले.

**(२) विभागीय सचिवांची साक्ष-** आश्वासनाचा विषय महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा असल्याने समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने आश्वासनाबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या सद्य:स्थितीच्या माहितीबाबत विचारणा केली असता, यासंदर्भात विभागाने सद्य:स्थितीच्या विवरणामध्ये नमूद केले आहे की, दिनांक १/४/२०१३ पासून राज्यात या प्रकरणी १०८ खटले दाखल करण्यात आले असून २६ प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आलेले आहेत.

दूध भेसळीस आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत २४X७ नियंत्रण कक्ष व टोलफ्री दूरध्वनी क्रमांक कार्यान्वित करण्यात आलेला आहे. भेसळयुक्त दुधाची तपासणी जागेवरच होण्याच्या दृष्टीने फिरत्या प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. दूध तपासणीच्या मोहिमा वेळोवेळी राबविण्यात येत असून, दिनांक १/४/२०१३ पासून दुधाचे एकूण ३,२६६ नमुने घेण्यात आले. असुरक्षित १०८ प्रकरणी खटले दाखल करण्यात आले आहेत व अप्रमाणित ५०९ प्रकरणी न्यायनिर्णय अर्ज व ९२ प्रकरणी तडजोड अर्ज दाखल करण्यात आलेले आहेत. अपमिश्रके मिश्रीत दूध प्रकरणी पोलिसात ४ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत तसेच मुंबईमधील झोपडपट्ट्यांमध्ये नामांकित ब्रँडच्या दुधाच्या पिशव्या फोडून त्यामध्ये पाणी भेसळ करणाऱ्यांविरुध्द वेळोवेळी मोहिमा राबवून कारवाई करण्यात येते.

विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, राज्यात दुधाच्या पिशव्यांवर २००६ च्या कायद्यानुसार गुणवत्तेनुसार ट्रेडमार्क आता सुरु केले आहेत. भारतामध्ये फुड ऑफ दि स्टँडर्ड अॅक्ट २०११ पासून लागू झालेला आहे. त्यामध्ये लेबलींगचे रेग्युलेशन आलेले आहे. त्या लेबलींगच्या रेग्युलेशनप्रमाणे आपण दुधाची क्वॉलिटी मॅनिफॅक्चरिंग डेट व कधी पर्यंत दुध पिऊ शकतो ती तारीख असणे आवश्यक आहे. पॅकेजिंग व लेबलींग अधिनियमाप्रमाणे सर्व माहिती देणे बंधनकारक केलेले आहे व प्रत्येक पॅकेजवर ती माहिती उपलब्ध असते.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, २४X७ नियंत्रण कक्ष टोल फ्री क्रमांक सुरु केला आहे का ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय. टोल फ्री क्रमांक सुरु केलेला आहे.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, आपण त्यात असे म्हटले आहे की, १०८ प्रकरणात खटले दाखल केलेले आहेत.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की,आपण १०८ प्रकरणात जे खटले दाखल केले ते कोणत्या शहरातील आहेत ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, १०८ प्रकरणात खटले दाखल केले, तो डेटा आमच्याकडे सध्या नाही. पण एकूण ३२३६ नमुने आम्ही मागील अडीच महिन्यात तपासले आहेत. त्यामध्ये दोन प्रकार आहेत. एक जे असुरक्षित दुध आहे त्यामध्ये १११ पैकी १०८ वर कारवाई केलेली आहे. ३ प्रकरणे सध्याची आहेत. त्यावर देखील खटला दाखल करण्याची कारवाई करणार आहोत.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, कारवाईचे स्वरुप काय असते ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, यामध्ये आम्ही गुन्हेगारी स्वरुपाचे खटले दाखल करतो.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की,ज्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत त्यांचे लायसेन्स रद्द करण्यात येते का ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, गुन्हे दाखल केलेले आहेत त्यांचे लायसेन्स रद्द करण्यात येत नाही. त्यामध्ये आम्ही आयपीसीच्या कलम २७२, २७३ अन्वये फुड अॅडलटरेशन बद्दलची आहे. परंतु या कलमांन्वये दाखल होणारे गुन्हे सध्या नॉन कॉग्निजिबल आणि बेलेबल आहेत. या संदर्भात हे गुन्हे कॉग्नीजीबल आणि नॉन बेलेबल करण्यासंदर्भातील प्रस्ताव गृह विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, आपण जे १११ प्रकरणात गुन्हे दाखले केले आहेत ते स्पेसीफीक तुमच्या ठरलेल्या जागेवर आहेत की, कसे ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, जे १११ गुन्हे दाखल केलेले आहेत, त्यात सन २०१३-१४ मधील ७३ प्रकरणे आहेत. मुंबईमधील २५, ठाण्यामध्ये १२, पुण्यामध्ये २२, नाशिकमध्ये ७, औरंगाबादमध्ये २, अमरावतीमध्ये ४ व नागपूरमधील १ प्रकरण आहे. तसेच सन २०१४-१५ मुंबईमध्ये ७, ठाण्यामध्ये ११, पुणे येथे ४, नाशिक-४, औरंगाबाद-४ असे सर्व वेगवेगळ्या ठिकाणी गुन्हे दाखल केले आहेत.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की,समितीचे एवढेच म्हणणे आहे की, जिथे प्रॉब्लेम होतात तिथे गुन्हे दाखल केले जात नाहीत.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, विभागीय स्तरावर वरीलप्रमाणे गुन्हे दाखल केले आहेत.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, यामध्ये नाशिक, मुंबई, नागपूर व औरंगाबाद अशाच ठिकाणी गुन्हे दाखल केलेले दिसले.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, पुणे विभागात सांगली, सातारा जिल्हे येतात.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की,आपण कलम २७२ व २७३ ऐवजी कलम १०० नुसार संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात यावा.

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, महोदय, फुड अॅण्ड ड्रग्स अॅक्टनुसार कलम आहे. यामध्ये काही राज्यांनी सुधारणा करुन आयपीसी २७२ व २७३ मध्ये आजीवन कारावासाच्या शिक्षेची तरतूद केलेली आहे व तसे आपण प्रप्रोजल मुव्ह केलेले आहे. लॉ अॅण्ड ज्युडिशिअरीकडे प्रकरण पाठविले आहे.

यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, विभागाकडे फुड अॅण्ड ड्रग्जचा वेगळा कायदा आहे का ?

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, नाही. फुड सेफ्टी अॅण्ड स्टॅंडर्ड अॅक्ट आहे. त्यानुसार कारवाई केली जाते.

यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, मला तर वाटते की, आयपीसीचा कायदा ऑल इंडिया लेव्हलवर आहे.

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, होय. पण त्या कायद्यामध्ये राज्याला सुधारणा करण्याचे अधिकारी आहेत. हे आपण सेंट्रल गव्हर्मेंटच्या परवानगीने करु शकतो. चार ते पाच राज्यांनी तसे केले आहे.

यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, भेसळच्या प्रकरणांमध्ये आयपीसीप्रमाणे कारवाई केली जाते का ?

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, आपण आयपीसीप्रमाणे कारवाई करतो.

यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, फुड अॅण्ड ड्रग्जचा कायदा वेगळा आहे का ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय. हा कायदा वेगळा आहे. फुड सेफ्टी अँण्ड स्टँडर्ड अँक्टच्या कलम ५९ व ५८ प्रमाणे कारवाई केली जाते. माननीय सुप्रीम कोर्टाने एका प्रकरणात सेंट्रल गव्हर्मेंटला डायरेक्शन दिले होते की, दूध भेसळचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असून कायद्यात सुधारणा करुन शिक्षेची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी. त्यानुसार सेंट्रल गव्हर्मेंटच्या फुड सेफ्टी ऑथॉरिटी ऑफ इंडियाचे सी.ई.ओ. यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, बाजारात केमिकल दूध येत आहे. युरिया अँडलटरेशनची प्रकरणे आहेत काय ?

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, मागील वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यात युरिया अँडलटरेशनचे एकही प्रकरण समोर आले नाही.

यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, सांगली येथे दुधामध्ये युरिया मिक्स केला जातो.जो मैला तयार होतो तो सुध्दा ठिकाणावर राहिलेला नाही अशी परिस्थिती आहे कारण सगळीच प्रक्रिया तशी होत राहिली आहे. आता तुम्ही त्याला टोटली जबाबदार आहात असे आम्ही म्हणणार नाही. जनरली ही जी यंत्रणा आहे, त्या यंत्रणेमध्येच दुरुस्ती झाली पाहिजे, कायदा सक्षम झाला पाहिजे. अटक झाल्यावर तो ५ मिनिटांत सुटून बाहेर येतो.

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, होय महोदय.

यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, दोन मुद्दे आहेत. तुम्ही आता पाकिटातून दूध देता. पाकिटातून दूध देणाऱ्या महाराष्ट्रात किती कंपन्या आहेत, याची माहिती आहे काय ? दुसरे म्हणजे तुम्ही सांगितले की, पाकिटावर सर्व लिहिले जाते, त्याची क्वालीटी कोण चेक करते ?

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, महोदय, क्वालीटी आमचेच रँडमली जेव्हा ...

यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, अशी तपासणी तुम्ही केली आहे काय ?

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, केली आहे.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, १०८ संपूर्ण राज्यात दाखविले आहे.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, नाही महोदय ते असुरक्षित आहे. आम्ही टोटल तपासणी ३२६६ सॅम्पल्सची केली. त्यातील १११ जे आहेत ...

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, पॅकेट मधून दूध देणाऱ्या किती कंपन्या आहेत याची माहिती आपल्याकडे आहे काय ? महाराष्ट्रात १ हजार कंपन्या पॅकेटमधून दूध विकतात अशी काही आकडेवारी आपल्याकडे आहे काय ?

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, नाही.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, मग त्यावर कंट्रोल कोण करणार, हे पॅक पॅकेटचे झाले. लूज दूध विकणाऱ्यांवर कोण कंट्रोल करणार ? खेडेगावामध्ये दूधात सर्रास भेसळ होऊ लागली आहे. आताच सांगितल्याप्रमाणे त्यात युरिया आणि आणखीही काय काय घालतात. काही लोक तेलसुध्दा मिक्स करु लागले आहेत आणि केमीकल दूध तयार व्हायला लागलेले आहे. आमच्या येथे जत तालुक्यात याबाबतीत रेड पडली आणि पकडल्याचे दाखवतात पुन्हा सोडतात, पुन्हा त्यांचा धंदा चालूच असतो. कोण आहेत तुमचे सांगली जिल्ह्याचे इन्स्पेक्टर बघा तेथे. आमदार नसताना मी स्वत: जाऊन दोनदा त्यांच्याकडे तक्रार केलेली आहे. तुम्ही हे जे एकमेकांना मॅनेजमेंट करता ते बरोबर नाही. ते लोक लहान मुलांच्या आरोग्याच्या भवितव्याशी खेळत आहेत. मॅक्झिमम लहान मुलांना दूध दिले जाते. आपण दूध हे पूर्णब्रम्ह म्हणतो आणि एकीकडे तुम्ही लोकांना विष पाजत आहात हे कसे होणार ? तुम्ही १०८ केसेस म्हणता महाराष्ट्रात लाखो केसेस दाखल झाल्या पाहिजेत. कुठे होतात तुमच्या केसेस दाखल? दूधाचा धंदा म्हणजे पाण्याचा धंदा असे आपण जनरली बोलतो भेसळशिवाय दूध विकले जाते काय, युरिया शिवाय दूध विकले जाते काय, अजिबात नाही. युरिया जाऊ द्या पाणी तर असते ना त्यामध्ये. हे बघतच नाहीत. फूड अँड ड्रगचे अधिकारी जिल्ह्याला किती सॅम्पल काढतात याचा जिल्हावाईज आढावा तुमच्या लेव्हलला घ्यावा. किती सॅम्पल घेतले आणि त्यापैकी कितीमध्ये फॉल्ट सापडला याचा जर तुम्ही आढावा घेतला तर ते तुम्हाला सुध्दा समजेल.

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, होय महोदय. आम्ही जे ३२६६ सॅम्पल्स घेतले, ते जिल्हावाईजच घेतले होते.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, त्यात फॉल्टी किती निघाले ?

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, महोदय, १११ सॅम्पल्स फॉल्टी निघाले.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, हे शक्य आहे का ते सांगा. येथे बसलेल्या कोणाही सदस्यांना हा आकडा न पटण्यासारखा आहे.

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, साहेब यामध्ये दोन बाकी आहेत.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, हे सॅम्पल पॅक्ड दुधाचे आहेत काय ?

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, होय.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, पॅक्ड किंवा लूज दोन्ही बाबत एकच विषय आहे की, त्यामध्ये भेसळ होऊ नये. यांनी आता पॅक्ड दूधाबाबत सांगितले की, काय क्वालिटीचे दूध पाहिजे, त्यामध्ये किती फॅट पाहिजे, वगैरे माहिती पिशवीवर असणार आहे. पण ते कोण चेक करणार, तुमची माणसे चेक करतात काय, त्याच्यावर तुम्ही कधी प्रयोग केला आहे काय ?

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, होय महोदय, आम्ही जे ३२६६ नमुने घेतलेले आहेत ते त्यातीलच आहेत.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, आपण आयुक्त आहात आपण असे सांगून कसे चालेल ? संपूर्ण राज्यातील ३२६६ नमुने घेतले आणि त्यातील १०८ सापडतात, ही किती बोगसगिरी आहे ते सांगा ना. हे काय खरे आहे काय ?

यावर विभागीय सचिवांनीअसे सांगितले की, महोदय, यामध्ये दोन प्रकार आहेत. एक जे आहे ते सबस्टॅंडर्ड म्हणजे कमी दर्जाचे दूध अशा ६६२ केसस आहेत. अनसेफ १११ आहेत, असे आम्हाला आढळले आहे.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, सबस्टॅंडर्ड म्हणजे विकायला लायक आहे काय ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सबस्टॅंडर्ड म्हणजे त्यात बटर कंटेंट कमी असते. त्यामध्ये फॅट कंटेंट वगैरे कमी असतो.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, ते निकृष्ट दर्जाचे समजले जाते की, उत्कृष्ट दर्जाचे समजले जाते ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, निकृष्ट दर्जाचे.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, मग ते विकायला लायक आहे काय ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, नाही.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, निकृष्ट दर्जाचे दूध असल्याचे सॅम्पलमध्ये दिसून आले. तरी दूधाची विक्री सुरु आहे. माझा मुद्दा तोच होता की, जे खराब दूध बाजारात येते त्यावर तुमचे कंट्रोलच नाही. एवढे सॅम्पल निकृष्ट दुधाचे निघाले तुम्ही त्यावर काय कारवाई केली, किती खटले दाखले केले ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की,महोदय, त्यामध्ये आपण १०८ खटले दाखलकेले ?

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, १०८ हा आकडाच मुळात आपल्या बुध्दीला चालना देणारा आहे. हे आकडे बोगस आहेत. तुम्ही खालच्या लोकांकडून याची माहिती घ्यावी.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, ठीक आहे साहेब.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, जिल्हानिहाय आढावा घ्यावा. जेथे डेअऱ्या सुरु आहेत, तेथे सर्रास भेसळ सुरु आहे. पाणी हा तर भेसळीचा एक प्रकार आहेच अधिक युरिया आणि इतर सर्व भानगडी तेथे सुरु आहेत. कुठल्याही नोकल डेअरीत भेसळ ही आहेच. सगळयाच ठिकाणी आहे असे माझे म्हणणे नाही. परंतु, काही ठिकाणी आहे. काही ठिकाणी चांगला धंदा देखील आहे.त्यातल्या त्यात १८८ प्रकरणात न्यायालयाने ४४ लाख रूपयांचा दंड केलेला आहे. १४९ प्रकरणात तडजोड झाली. ८ लाख ९९ हजार रुपये एवढा दंड वसूल करण्यात आला. तडजोड म्हणजे काय, त्यांच्याशी तडजोड कोण करते ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, आपण त्याला कंपाऊंडींग म्हणतो. जेथे सबस्टॅंडर्ड दूध मिळते त्या ठिकाणी कंपाऊंडींग करण्याचे एक लाख रुपयांच्या आतपर्यंत दंड लावण्याचे अधिकारअसिस्टंट कमिशनरना आहेत. कंपाऊंडींग म्हणजेच तडजोड. त्यांनी जवळपास १२ लक्ष रूपयांचा दंड आकारलेला आहे

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, आतापर्यंत एकूण किती दंड वसून करण्यात आला ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, ऑगस्ट, २०११ पासून ते आतापर्यंत १ कोटी ६ लक्ष रुपयांचा दंड वसूल झालेला आहे.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, तडजोड करण्याची पध्दतीबाबत सांगावे.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, तडजोडमध्ये जी पार्टी असते तिला ते बोलावतात. लॅब रिपोर्ट आपल्याकडे असतो. दूधाचे सॅम्पल अनसेफ असुरक्षित असल्याचे आढळले तर अशा प्रकरणात आपण पोलीस खटलेच दाखल करतो. नवीन कायद्यात आता दंडाची तरतूद त्यांनी ठेवलेली आहे. जे अनसेफ नाही त्याकरिता दंड आकारण्याची तरतूद त्यांनी ठेवलेली आहे. १ लाख रुपयांपर्यंतचा दंड डेसिग्नेटेड ऑफिसर म्हणजे असिस्टंट कमिशनर करु शकतात. ते अधिकार त्यांना दिलेले आहेत.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, तडजोड तेच करु शकतात का ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय महोदय. तडजोड म्हणजे कंपाऊंडिंग. त्याच्यावरचे अधिकार जॉईंट कमिशनरना आहेत. त्यांना आपण ॲडज्युरिकेशन ऑफिसर म्हणतो. तडजोड म्हणजे थोडक्यात दंड देण्याचे अधिकार.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, मला १ लाख रुपयांचा दंड झाला आणि मी असिस्टंट कमिशनर समोर गेलो तर, ते तो दंड ५० हजार रुपये करु शकतात, असे हे आहे काय ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, नाही. महोदय तडजोड म्हणजेच दंड लावण्याचे अधिकार, दंड करण्याचे अधिकार.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, तडजोड म्हणजे तुम्ही निगोशिएट करत नाही काय ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, नाही. हा शासकीय शब्द आहे.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, बँकेमध्ये ज्याप्रमाणे वनटाईम सेटलमेंट होते, आम्हाला तीच तडजोड वाटले. यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, तसे नाही.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, जास्तीत जास्त दंड किती आहे ? साध्या दूध डेअरीवाल्याकरिता एक लाख रुपयांचा दंड जास्त असू शकतो. सर्वसामान्य माणसाला दुधामध्ये भेसळ आढळल्यानंतर काय करायचे, कुठल्या लॅबमध्ये जायचे ते माहीतच नसते. ते फक्त तक्रार करतात मग त्या दूधाचे सॅम्पल पाहिले जाते. परंतु, त्या माणसाला न्याय मिळत नाही.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, आम्ही आता असे केले आहे की, ज्या लॅब अशा ॲक्रिडेटेड आहेत, ती सर्व यादी आमच्या वेबसाईटवर टाकलेली आहे.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, अशा किती लॅब आहेत ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की,शासनाच्या १६ आहेत. तसेच, फुड सेफ्टी ऑथॉरिटीने अक्रिडेटेड केलेल्या १८ आहेत. एकुण ३४ लॅब महाराष्ट्रात आहेत.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, समस्त ग्रामपंचायतींना आपण आपल्या विभागाकडून एक परिपत्रक काढले पाहिजे आणि ते त्यांच्या नोटीसबोर्डवर लावले गेले पाहिजे की, भेसळ असल्यास अशा अशा ठिकाणी कळवावे, अमूक करावे वगैरे सारखे काही केले पाहिजे. हे आपण करु शकता. हे आपल्या हातात आहे. ग्रामपंचायती आपल्या खर्चाने ते करतील फक्त आपल्याला एक आदेश करावयाचा आहे. ग्रामपंचायती त्यांच्या पैशातून असा बोर्ड लावतील की, दूधात भेसळ आढळल्यास असे असे करावे. आपल्याला हा विषय छोटा वाटतो. परंतु, लहान मुलांच्या जिवाशी खेळणारा हा विषय आहे.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, आम्ही करतो. यामध्ये आमच्या २४ तास हेल्पलाईनचा नंबर आहे तो पण देतो.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, मराठी भाषिक रिजनल वृत्तपत्रांमध्ये 'जागो ग्राहक जागो' अशी जाहिरात द्यावी.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, सन्माननीय सदस्य सूचना देत आहेत, त्याप्रमाणे आपण पब्लिसिटी करु या. जाहिरात वगैरे देऊया.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, त्यापेक्षा मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नोटीसबोर्डवर लिहिले तर गाव किंवा तालुका पातळीवर दूध चेक करता येईल. कारण केवळ दूधाच्या चेकिंग करिता दूधाचे सॅम्पल घेऊन जिल्हा लेव्हलला कोण जाणार ? आपण लॅबची यादी आणली आहे काय ? आम्हाला त्या यादीची प्रत द्यावी.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, या लॅब शासकीय आहेत की खाजगी आहेत ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, शासकीय व खाजगी दोन्ही आहेत.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, खाजगी लॅबमधील तपासणी आपण मान्य करता काय ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की,महोदय, खाजगी लॅब फूड सेफ्टी ऑफ इंडियाने ॲक्रिडेटेड केलेल्या आहेत. त्यांची तपासणी आम्ही मान्य करतो.

अभिप्राय व शिफारशी :-

"राज्यात दुधाच्या पिशव्यांवर गुणवत्तेचा ट्रेडमार्क छापणेबाबत" या विषयावरील श्री.अशोक पवार, वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १०८४४७ ला सभागृहात उत्तर देताना मा.वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये राज्यमंत्री यानी "याबाबत निश्चितपणे लक्ष दिले जाईल. तसेच यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती सदनाच्या पटलावर ठेवण्यात येईल" असे आश्वासन दिले आहे.

समिती समोर साक्षीच्या वेळी विभागीय सचिवानी नमूद केले की, दिनांक १ एप्रिल, २०१३ पासून राज्यात या प्रकरणी १०८ खटले दाखल करण्यात आले असून २६ प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आलेले आहेत. भेसळमुक्त दूधाची तपासणी जागेवरच होण्याच्या दृष्टीने फिरत्या प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. दूध तपासणीच्या मोहिमा वेळोवेळी राबविण्यात येत असून, दिनांक १ एप्रिल, २०१३ पासून दूधाचे ३,२६६ नमुने घेण्यात आले आहेत व १०८ प्रकरणी खटले दाखल करण्यात आहे आहेत. त्यामध्ये आयपीसीच्या कलम २७२, २७३ अन्वये अन्न भेसळ प्रतिबंध बद्दलची आहे परंतु या कलमान्वये दाखल होणारे गुन्हे सध्या अदखलपात्र आणि जामीनपात्र आहेत. **दूध भेसळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असून शिक्षेची कठोर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या संदर्भात हे गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र करण्यासंदर्भातील जो प्रस्ताव गृह विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे त्याचा पाठपुरावा करून त्वरीत निर्णय घ्यावा व तो अमलात आणण्याबाबत त्वरेने कार्यावाही करावीअशी समिती शिफारस करीत आहे.**

राज्यात दुधामध्ये भेसळ केली जाते ती थांबविण्यासाठी सध्याची दूध तपासण्याची जी यंत्रणा आहे ती पुरेशी आहे असे समितीला वाटत नाही या यंत्रणेमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे असे समितीचे मत आहे. **दुधात भेसळ करणे हा विषय लहान मुलाच्या जीवाशी खेळणारा आहे. याबाबत खबरदारी घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे दुधात भेसळ असल्यास अशा-अशा ठिकाणी कळवावे, अमूक-अमूक करावे इत्यादी बाबतच्या सूचना नोटीस बोर्डवर लावण्याबाबत समस्त ग्रामपंचायतीना कळविण्याबाबतचे सर्वंकक्ष परिपत्रक विभागाने त्वरीत निर्गमीत करावे अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.**

## आदिवासी विकास विभाग

**विधानसभा आश्वासन क्रमांक ४११ व ४१३, विधानसभा कामकाज खंड १६६, पृष्ठ क्रमांक १४, दिनांक २ ऑगस्ट, २०१३.**

"ठाणे व चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी वर्षानुवर्षे कसत असलेल्या जमिनी वनहक्क कायद्यानुसार आदिवासींच्या नावे करण्यास दिरंगाई होत असल्याबाबत" या विषयावरील श्री.जितेंद्र आव्हाड व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १११७३७ ला उत्तर देताना मा.आदिवासी विकास मंत्री यांनी हे सर्व दावे शासन स्तरावर पुन्हा एकदा तपासले जातील. तसेच दळी आणि एकसाली लिहून यासंबंधी स्वयंसेवी संस्था व संघटना यांच्याबरोबर बैठका घेऊन याचा निपटारा करण्यात येईल. महाराष्ट्र राज्यात दळी जमीन देण्यात येईल असे आश्वासन दिले होते.

**१) विभागाने आश्वासनावर केलेली कारवाई -** विभागाकडून आश्वासनाच्या पूर्ततेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

वनहक्क कायद्याअंतर्गत दावेदाराने दाखल केलेल्या दाव्यानुसार त्यांनी मागणी केलेल्या क्षेत्रफळा संबंधी ग्रामसभेचा किंवा उपविभागीय स्तरीय समितीचा निर्णय अथवा शिफारस अपुर्ण असल्याचे अथवा प्रथमदर्शनी अधिक तपासणी करणे आवश्यक आहे, असे आढळल्यास उपविभागीय स्तरीय समिती अथवा जिल्हास्तरीय समिती अशा दाव्यात फेरबदल करण्याऐवजी किंवा तो फेटाळण्या ऐवजी सदर दावा परिस्थिती अनुरुप ग्रामसभेकडे, उपविभागीय स्तरीय समितीकडे पुर्नविचारार्थ पाठविण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास अध्यक्ष, जिल्हास्तरीय समिती तथा जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यात रायगड जिल्ह्यात दळी जमिन वनहक्काबाबत माहे एप्रिल, २०१४ अखेर करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे:--

| | |
|---|---|
| ग्रामसभेकडे प्राप्त झालेल्या वैयक्तिक दाव्यांची संख्या (दळी जमीन) | तालुका -पनवेल-२६२ |
| | तालुका- रोहा-२४६ |
| | तालुका-महाड-८२ |
| | एकूण दावे- ५९० |
| ग्रामसभेने उपविभागीय स्तरीय समितीकडे शिफारस केलेल्या दाव्यांची संख्या | तालुका -पनवेल-२६२ |
| | तालुका- रोहा-२४६ |
| | एकूण दावे- ५०८ |
| ग्रामसभेने अमान्य केलेले दावे | तालुका-महाड-८२ |
| उपविभागीय समितीने शिफारस केलेले दावे | तालुका- रोहा-४२ |
| जिल्हास्तरीय समितीने मान्य केलेले दावे | तालुका- रोहा-४२ |
| उपविभागीय स्तरीय समितीकडे प्रलंबित असलेले दावे | तालुका -पनवेल-२६२ |
| | तालुका- रोहा-२०४ |
| | एकूण दावे- ४६६ |

रायगड व ठाणे जिल्ह्यामध्ये तत्कालिन ब्रिटीश सरकारने वन जमिन कसण्यासाठी लोकांना दिलेली आहे. त्यास अनुक्रमे दळी प्लॉट व एकसाली लिज असे संबोधण्यात येते. अशा प्लॉट धारकांना नियमाप्रमाणे वनहक्क कायद्याचा लाभ देण्यात येत आहे. आश्वासनावर शासनाने केलेल्या कार्यवाहीवर विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे समितीने निश्चित केले.

**(२) विभागीय सचिवांची साक्ष-** आश्वासनाचा विषय महत्वाचा व जिव्हाळ्याचा असल्याने समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने आश्वासनाबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या सद्यःस्थितीच्या माहितीबाबत विचारणा केली असता, यासंदर्भात विभागाने सद्यःस्थितीच्या विवरणामध्ये नमुद केले आहे की, वनहक्क कायद्या अंतर्गत ठाणे, पालघर व चंद्रपूर जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर, २०१५ अखेर मंजूर करण्यात आलेल्या वैयक्तिक वनहक्क दाव्यांची सद्यस्थितीदर्शक कार्यवाही खालीलप्रमाणे :--

| जिल्हा | प्राप्त वैयक्तिक वनहक्क दावे | मान्य दावे | | | टायटल्स वाटप | मान्य वन क्षेत्र (एकर) | ७/१२ वाटप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मूळ | अपिल | एकूण | | | |
| ठाणे | १५९७१ | २७४२ | २७१८ | ५४६० | ५१५० | ६५८८ | ४२८७ |
| पालघर | ४२६९३ | १७५८८ | १३०९८ | ३०६८६ | ३०६७९ | ३८२५४ | ३०६७९ |
| चंद्रपूर | २१२२६ | ३३८० | २९९ | ३६७९ | ३६७९ | १०८८० | २५१४ |

वनहक्क कायद्यांतर्गत प्रलंबित दावे, जमीन मोजणी, जमीन अधिकार पत्र वाटप, इ. अनुषंगीक कामे माहे डिसेंबर, २०१५ अखेर कालबद्ध कार्यक्रम राबवून पूर्ण करण्याविषयी संबंधित जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

रायगड जिल्ह्यामध्ये तत्कालीन ब्रिटीश सरकारने कसण्यासाठी लोक ना दिलेल्या वन जमिनीस दळी प्लॉट असे संबोधण्यात येते. वनहक्क कायद्यांतर्गत रायगड जिल्ह्यात दळी वन जमीन दाव्यांबाबत माहे सप्टेंबर, २०१५ अखेर करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| ग्रामसभेकडे प्राप्त झालेल्या वैयक्तीक दाव्यांची संख्या (दळी जमीन) | ६६३ |
| उपविभागीय समितीने शिफारस केलेले दावे | ६६३ |
| जिल्हास्तरीय समितीने मान्य केलेले दावे | ६६३ |

ठाणे व पालघर जिल्ह्यामध्ये तत्कालीन ब्रिटीश सरकारने कसण्यासाठी लोकांना दिलेल्या वन जमिनीस एकसाली प्लॉट असे संबोधण्यात येते. वनहक्क कायद्यांतर्गत पालघर व ठाणे जिल्ह्यात अशा एकसाली वन जमीन दाव्यांबाबत माहे सप्टेंबर, २०१५ अखेर करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे :-

| कार्यवाहीचे स्वरुप | पालघर | ठाणे |
|---|---|---|
| ग्रामसभेकडे प्राप्त झालेल्या वैयक्तीक दाव्यांची संख्या (एकसाली प्लॉट) | २०५९ | ४४३ |
| उपविभागीय समितीने शिफारस केलेले दावे | २०३४ | ३९४ |
| जिल्हास्तरीय समितीने मान्य केलेले दावे | २०३४ | ३९४ |
| प्रलंबित दावे | २५ | ४९ |

मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, ठाणे व चंद्रपूर जिल्ह्यातील आदीवासी वर्षानुवर्षे कसत असलेल्या जमिनी वन हक्क कायद्यानुसार आदिवासींच्या नावे करण्यास दिरंगाई होत असल्याबाबतची ही आश्वासने आहेत.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, सन २००६ मध्ये वन हक्क कायदा झाला. आपण सन २००८ पासून त्याची अंमलबजावणी सुरु केलेली आहे. ठाणे, पालघर आणि चंद्रपूर या भागात काही प्रमाणात कमी झाली होती हे मी मान्य करतो. प्रत्यक्षात ही कार्यवाही महसूल विभागाकडून होत असते. आमचा विभाग संनियंत्रण करीत असतो. आम्ही फक्त नोडल विभाग म्हणून काम करीत असतो. महसूल विभागाची गाव पातळीवर कमिटी आहे. एस.डी.ओ.पातळीवर एक कमिटी आहे. तसेच जिल्हाधिकारी पातळीवर एक कमिटी आहे. टप्प्याटप्प्याने केसेसचा निपटारा होत असतो. ठाणे जिल्ह्यामध्ये वैयक्तिक हक्काची १५ हजार ९७१ प्रकरणे आहेत. त्यापैकी एकूण ५ हजार ४०७ केसेसचा दावा मान्य झालेला आहे. बाकीच्या केसेसचा दावा मान्य झालेला नाही. वैयक्तिक हक्काची प्रकरणे १५९७१ आहेत. मान्य झालेली प्रकरणे ५४०७ आहेत. बाकीची अमान्य झालेली आहेत. ५१५० ठिकाणी हक्क दिलेले आहेत. ७/१२ मध्ये प्रत्यक्ष मालकीचा हक्क आपण देत नाही. मालकीचे हक्क वन विभागाचे असतात. इतर हक्कामध्ये आदिवासी कुटूंबाचे नाव आपण देत असतो. मालकी हक्क नसला तरी त्यांची प्रॉपर्टी आहे असे समजायला काही हरकत नाही. त्यांना त्या माध्यमातून इतर सर्व प्रकारचे अधिकार मिळत असतात. बँकेकडून कर्ज घेणे, टायटल वारसांना देणेबाबतचे सर्व हक्क आपण देत असतो. पालघरमध्ये एकंदरीत प्रकरणे ४२४९३ आहेत. त्यापैकी ३०४८६ मंजूर झालेली आहेत. या मंजूरपैकी सर्व टायटल दिलेली आहेत. पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मागील एक वर्षात खूप मोठया प्रमाणावर काम केलेले आहे. रायगडमधील जिल्हाधिकारी यांनीसुध्दा खूप इंटरेस्ट घेतला आहे. याचा आढावा मी नेहमी माझ्या पातळीवर घेत असतो. मुख्य सचिवांनी याचा आढावा प्रत्येक तीन महिन्याला घ्यावा असे म्हटले आहे. चंद्रपूरमध्येही असाच प्रकार आहे. चंद्रपूरमध्ये २१२२६ प्रकरणांपैकी ३६८९ टायटलचा निपटारा केलेला आहे. प्रत्यक्ष गती देण्याकरिता राज्य शासनाने अनेक उपक्रम हाती घेतलेले आहेत. मुख्य सचिवांच्या पातळीवर मिटींग होत असतात. जेथे ही प्रकरणे कमी झालेली आहेत, तेथे आम्ही आमच्या योजनेतून आणि केंद्र शासनाकडून काही अनुदान घेऊन जिल्हाधिकारी पातळीवर एक स्वतंत्र यंत्रणा उभी केलेली आहे. अशा प्रकारची प्रकरणे प्रोत्साहन करण्याच्या दृष्टीकोनातून केलेली आहेत. याची नियमावली व प्रोसीजर समजून सांगण्याकरिता जिल्हाधिकारी पातळीवर व तालुका पातळीवर एक स्वतंत्र यंत्रणा उभी केलेली आहे. त्या धर्तीवर यावर्षी मागील चार पाच महिन्यात आमच्या विभागाच्या एटीसी कार्यालये व कमीशनरची कार्यालयातून तेथे एक स्वतंत्र यंत्रणा मानधन तत्वावर उभी केलेली आहे. त्याचा आढावा प्रत्येक महिन्यास कमीशनर घेत असतात. तसेच मुख्य सचिवही घेत आहेत. दरम्यानच्या काळात पंतप्रधान कार्यालयाकडूनही याचा आढावा घेतला गेला. ते केवळ महाराष्ट्राचा नव्हे तर पूर्ण देशाचा आढावा घेऊ लागले आहेत. मागील एक वर्षातील महाराष्ट्राची परिस्थिती बऱ्यापैकी आहे असे या आढाव्यावरुन सांगता येईल. प्रत्येक राज्याची तुलना गुजरातशी होत असते. पण गुजरातच्या तुलनेमध्ये या कायद्यांतर्गत आपल्या राज्याने फार मोठया प्रमाणात टायटल दिलेली आहेत. काही ठिकाणी प्रकरणे कमी असली तरी आपण क्षेत्रही जास्त दिलेले आहे. यामध्ये दोन प्रकार आहेत. यामध्ये वैयक्तिक हक्क व कम्युनिटी हक्काबाबतची प्रकरणे आहेत. कम्युनिटी राईटसमध्ये जवळपास ११ लाख एकर जमीन आपण दिलेली आहेत. ही गुजरातच्या तुलनेत १५-२० टक्के जास्त आहे.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, सामूहिक म्हणजे काय ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या कायद्यांतर्गत कुटूंबाला त्यांच्या नावाने आपण जमीन देतो तो वैयक्तिकरित्या असलेला प्रकार आहे. पण त्या गावाचे काही हक्क त्या वनावर असतात. पारंपारिकरित्या त्या भागातून ते येत असतात. ते निश्चित केलेले किमान क्षेत्र १००-२००-४०० एकर आहे. गावाची लोकसंख्या बघून ते लोक कोठपर्यंत त्या वनावर आधारित आहे हे पाहिले जाते. त्या गावकऱ्यांच्या जीवनशैलीवर आधारीत मायनर फॉरेस्ट प्रॉडक्ट तेथून आणले जातात. त्यांना

ते जवळच्या बाजारपेठेमध्ये विकावयाची आहेत, त्यातून त्याचा उदरनिर्वाह होतो. असे क्षेत्र १०० -२००-४०० एकर आहे. या करिता वन विभागाचे अधिकारी संमती देत असतात. या समाजाकरिता मायनर फॉरेस्ट प्रॉडक्ट म्हणजे बांबू, तेंदू इत्यादी कोणत्याही प्रकारची असू शकतात. यावर त्यांचे हक्क असतात. मागील वर्षी राज्यामध्ये अशा प्रकारे सामुहिक वन हक्क दिले. तेंदू, बांबू तोडून कलेक्शन करुन विक्री करण्यासाठी विभागाच्या वतीने आम्ही मदत करीत असतो. ट्रायबल डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या वतीने मागील वर्षी प्रामुख्याने विदर्भात व काही प्रमाणात पालघरमध्ये साडेचार कोटी रुपये आपण वर्कींग कॅपीटल म्हणून दिलेले आहे. येथे एक कमिटी असते, त्या कमिटीला तोडणी करावयाची असल्यास कोणतीही बँक त्यांना पैसा देत नाही. म्हणून आपण ट्रायबल डेव्हलपमेंट कार्पोरेशनकडून त्यांना वर्कींग कॅपीटल बिनव्याजी देत असतो. या विक्रीतून आलेल्या पैशातून त्याची आपण रिकव्हरी करीत असतो. मागील वर्षी साडे चार कोटी दिलेले आहेत. यावर्षी सात कोटी देण्याचे आम्ही टारगेट ठेवले आहे.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, एका जिल्हयात १५९०० प्रकरणामध्ये ७/१२ वाटप ४९८७ झालेले आहेत. चंद्रपूरमधील २१२२६ प्रकरणामध्ये २५१५ प्रकरणी ७/१२ उतारे वाटप झाले आहे. तुमची सिस्टीम एकच आहे. आहे त्या व्यवस्थेमध्ये पालघरच्या जिल्हाधिकारी यांना जे जमले ते ठाणे व चंद्रपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना का जमत नाही ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, ठाणेमध्ये बरी परिस्थिती आहे, तुलनेने चंद्रपूरची कमी आहे.

त्यावर मा. सदस्यांनी विचारणा केली की, १५९७१ दाव्यांपैकी ४२८७ दाव्यांमध्ये ७/१२ वाटप निकाली काढले आहेत. म्हणजे तेथे किती राहिले आहेत ? म्हणजे पालघरच्या जिल्हाधिकारी यांनी मनापासून काम केलेले आहे असे आम्हाला येथील कागदावरुन वाटते. बाकीचे लोक आहे त्या सिस्टीममध्ये का करीत नाहीत. तुम्ही त्यांच्यावर कोणती कारवाई करता ? त्यांना काही बंधन घातले पाहिजे. मला असे वाटते की, मान्य क्षेत्रप्रमाणे हे बरोबर दिसत आहे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, वैयक्तिकमध्ये ४ हेक्टरपर्यंतची मर्यादा आहे. राज्यामध्ये आपण तीन लाख एकर जमीन दिलेली आहे. सरासरी ८० गुंठे म्हणजे दोन एकर झालेली आहे. चार हेक्टर म्हणजे १० एकर आहे. १० एकरच्या पात्रतेनुसार आपण सरासरी दोन एकर जमीन दिलेली आहे. या करिता बरीच कारणे आहेत, प्रामुख्याने ज्यांचे हक्क स्थापीत करावयाचे आहेत, जेथे क्षेत्र कमी आहे, तेथे आपण सॅटेलाईट पिक्चर्स घेत असतो. २००५ पर्यंतच्या प्रकरणात व २००७ पर्यंत ताब्यात असणारे क्षेत्र द्यावे अशा प्रकारचा कायदा आहे. गाव पातळी व एसडीओ पातळीवरील समितीला वन हक्काचे अधिकार देत असताना आपल्या राज्यात खूप कंझरव्हेटीवली देत असतो. म्हणजे त्यांच्या पात्रतेपेक्षा कमी क्षेत्र दिले जाते. वन विभागाची या मुद्दयावर बऱ्याचदा चर्चा झालेली आहे. आता मुख्य सचिवांनी सांगितले की, त्यांच्या पातळीवर याकरिता एक कॉन्फरन्स घेणार आहे. चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती अशा ज्या जिल्हयामध्ये तुलनेने कमी काम झालेले आहे त्यावर लक्ष दिले जाणार आहे. पूर्वी पालघरमध्ये कमी काम झाले होते पण विद्यमान जिल्हाधिकारी यांनी प्रो-अॅक्टीव्हली इंटरेस्ट घेतला आहे. पालघरची आकडेवारी वाढलेली आहे पण ठाण्यामध्येही कमी आहे. अशा या ६-७ जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांची एक कॉन्फरन्स मुख्य सचिव लवकरच घेणार आहेत. ही कॉन्फरन्स घेतल्यानंतर याबाबतचे शासनाचे गांभीर्य जिल्हाधिकारी पातळीपर्यंत पोहचणार आहे. सध्या ही आकडेवारी कमी आहे हे मी मान्य करतो पण यामध्ये प्रगती दिसेल अशी माझी अपेक्षा आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, सुमारे ३० टक्के दावे तुम्ही मान्य करता. दावे आहेत १५ हजार आणि तुम्ही ५ हजार मान्य करतो. ३० टक्के दावे तुम्ही मान्य करता व जवळजवळ ७० टक्के दावे तुम्ही रिजेक्ट करीत आहात.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, रिजेक्ट केले असे मी म्हणत नाही. पेंडिंगमध्ये ठेवलेले आहेत.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, बाकीचे अमान्य समजायचे की प्रोसेसमध्ये आहे?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, प्रोसेसमध्ये ठेवले आहेत.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, पेंडिंग दावे किती दिवसात तुम्ही ते निकाली काढणार आहात? तीन महिन्यात किती दावे निकाली काढले पाहिजेत? पुढील काळात स्पीड वाढविला तर बरे होईल.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, पालघर जिल्हयाचे उदाहरण घ्या. तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी ३० हजार दावे मान्य केले. म्हणजे किती टक्के मान्य केले ते पहा. ४२ हजार पैकी ३० हजार मान्य केले.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, मागील वेळी मुख्य सचिवांकडे पीएमओ मधून व्हिडिओ कॉन्फरन्सिंग झाले होते. आज दुपारी देखील याच विषयावरील व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आहे. याबाबत अशा सूचना दिल्या आहेत की, डिसेंबर अखेरपर्यंत या सर्व प्रकरणांबाबत ठोस निर्णय घ्यावा. हो किंवा ना अशा प्रकारचा निर्णय घ्यावा. ना करण्यामध्ये विभागाचा इंटरेस्ट किती असतो याबाबत मी सांगणार नाही. एकदा ना केल्यानंतर त्याचे परिणाम काय असतात हे मी दोन तीन बैठकीमध्ये सांगितले. ना केल्यानंतर तेथे जमीन कसत असलेली जी आदिवासी कुटुंबे आहेत, बिगर आदिवासी परंतु वन क्षेत्रामध्ये राहणारी कुटुंबे आहेत त्यांना तिथून विस्थापित करावे लागणार आहे. तो एक मोठा सामाजिक प्रश्न होणार आहे. म्हणून राज्य शासनाने विचारपूर्वक निर्णय घेतला आहे. तुम्ही मान्य केले नसेल तर रिजेक्ट करु नये. रिजेक्ट केल्यानंतर त्यांचे हक्क संपणार आहे. म्हणून मागील दोन वर्षापासून आपण विचारपूर्वक निर्णय घेतलेले आहेत. तरी डिसेंबर अखेरपर्यंत या प्रकरणांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा अशा प्रकारचा स्पष्ट संदेश जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत गेलेला आहे. सकारात्मक दृष्टीकोनातून निर्णय व्हावा अशा प्रकारचे आमचे प्रयत्न सुरु आहेत.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, आदिवासींचा प्रश्न आहे. सकारात्मक निर्णय झाला तर चांगलेच आहे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय.

अभिप्राय व शिफारशी :-

"ठाणे व चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी वर्षानुवर्षे कसत असलेल्या जमिनी वनहक्क कायद्यानुसार आदिवासींच्या नावे करण्यास दिरंगाई होत असल्याबाबत" या विषयावरील श्री.जितेंद्र आव्हाड व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १११७३५ दिनांक २ ऑगस्ट, २०१३ रोजी सभागृहातउत्तर देताना मा.आदिवासी विकास मंत्री यांनी "हे सर्व दावे शासन स्तरावर पुन्हा एकदा तपासले जातील. तसेच दळी आणि एकसाली लिहून यासंबंधी स्वयंसेवी संस्था व संघटना यांच्याबरोबर बैठका घेऊन याचा निपटारा करण्यात येईल. तसेच राज्यात दळी जमीन देण्यात येईल" असे आश्वासन दिले आहे.

उक्त प्रकारच्या वन जमिनी ठाणे, पालघर, चंद्रपूर व रायगड जिल्ह्यामध्ये आहेत. सदर वन जमिनीबाबतची पालघर जिल्ह्यामध्ये एकूण ४२,४९३ प्रकरणे आहेत. त्यापैकी ३०,४८६ प्रकरणे मंजूर झालेली आहेत ही बाब कौतुकास्पद आहे असे समितीला वाटते. तथापि, ठाणे, चंद्रपूर व रायगड जिल्ह्यातील प्रकरणे प्रलंबित असण्याचे प्रमाण जास्त आहे.

विभागीय सचिवानी साक्षीच्या वेळी सांगितले की, अशा प्रकारच्या ६-७ जिल्हाच्या जिल्हाधिकाऱ्यांची एक कॉन्फरन्स मुख्य सचिव लवकरच घेणार आहेत व डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत सदर प्रकरणाबाबत ठोस निर्णय घेण्यात येणार आहे. **याबाबतसमिती अशी शिफारस करते की, सदर विषय आदिवासी जनतेच्या जमिनी कसण्याबाबतचा असल्याने शासनाने सकारात्मक निर्णय घेवून प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याची कार्यवाही करावी तसेच समितीला आश्वासीत केल्याप्रमाणे सर्व संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांची कॉन्फरन्स मुख्य सचिवांना घेण्याबाबत कार्यवाही करुन याबाबत निर्णय घ्यावा व केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी.**

## जलसंपदा विभाग

(१) **विधानसभा आश्वासन क्रमांक ७, विधानसभा कामकाज खंड १६६, पृष्ठ क्रमांक १, दिनांक १५ जुलै,२०१३.**

"सहस्त्रकुंड जलविद्युत (बहुउददेशिय) प्रकल्पाचे काम सुरू नसतानाही सहा कोटी रूपयाचा खर्च झाल्याबाबत" श्री.विजयराव खडसे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०९०४४ ला उत्तर देताना मा. जलसंपदा मंत्री यांनी "जनसुनावणीच्या वेळी जो प्रकल्प अहवाल सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने पुन्हा एकदा जनसुनावणी घेतली जाईल" असे आश्वासन दिले हेते.

(१) **विभागाने आश्वसनावर केलेली कारवाई-** विभागाकडून आश्वासनाच्या पूर्ततेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

सहस्त्रकुंड जलविद्युत (बहुउद्देशिय) प्रकल्पाचा सुधारित प्रकल्प अहवाल व त्यानुसार पर्यावरण आघात अहवाल तयार करणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सुधारित प्रकल्प अहवालानुसार केंद्रीय पर्यावरण विभागाकडे पर्यावरण आघात अहवाल सादर करण्यापूर्वी जनसुनावणी घेतली जाणार आहे. आश्वासनावर शासनाने केलेल्या कार्यवाहीवर विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे समितीने निश्चित केले.

(२) **विभागीय सचिवांची साक्ष -** आश्वासनाचा विषय महत्वाचा व जिव्हाळयाचा असल्याने समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने आश्वासनाबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या सद्य:स्थितीच्या माहितीबाबत विचारणा केली असता, या संदर्भात विभागाने सद्य:स्थितीच्या विवरणामध्ये नमुद केले आहे की, राज्यस्तरीय पर्यावरण समितीच्या दिनांक १२.९.२०११ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रकल्प "अ गटात" (A-Category) तील प्रकल्प असल्याने केंद्रीय पर्यावरण समितीकडून पर्यावरण विषयक मान्यता घेणेबाबतचे निदेश प्राप्त झाले होते.

उपरोक्त निर्देशानुसार प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण समितीस सादर केला. केंद्रीय पर्यावरण समितीने दिनांक १२.११.२०१३ च्या बैठकीत नव्याने TOR सादर करण्याचे सूचित केले आहे.

उपरोक्त निर्देशानुसार केंद्रीय पर्यावरण समितीस नव्याने TOR तयार करुन सादर करण्याबाबतची कार्यवाही प्रगतिपथावर आहे.

विभागीय सचिवांनी असे सांगितले की, जलसंपदा विभागाचे २०१३ च्या दुसऱ्या अधिवेशनातील जलसंपदा लाभक्षेत्र विभागाशी संबंधित एकूण ३ आश्वासनासाठी आज साक्षीसाठी बोलावले आहे. त्यात पहिले आश्वासन क्रमांक-७ आहे हे आश्वासन सहस्त्रकुंड जल विद्युत प्रकल्पासंबंधीचे आहे. हा सहस्त्रकुंड जल विद्युत प्रकल्प हा तालुका हिमायतनगर, जि.नांदेड या ठिकाणी पैनगंगा नदीवर नियोजित प्रकल्प आहे. हा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. तेथे एकूण २५ मे.वॅट वीज निर्मिती आणि ९५०० हेक्टर सिंचन क्षेत्र असे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. तेथे एकूण दोन धरणे बांधली जाणार आहेत. त्यामध्ये पहिले धरण हे पैनगंगा नदीवर असणार आहे, त्यामध्ये १४ गावे बुडित होणार आहेत. दुसरे धरण तेथील निर्गुण नाल्यावर होणार आहे. या धरणाची प्रशासकीय मान्यता २००९ मध्ये झाल्यानंतर.........

सहस्त्रकुंड विद्युत बहुउद्देशीय प्रकल्प सुरु करीत असताना ६ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याबाबतच्या प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर येत नाही. ३.९६ कोटी रुपये हा खर्च सर्वेक्षण व अन्वेषणावर झालेला आहे. जन सुनावणीच्या वेळी जो प्रकल्प अहवाल सादर करण्यात आला होता त्या अनुषंगाने पुन्हा जन सुनावणी घेण्यात येईल असे आश्वासन आहे. याची पार्श्वभूमी मी आपल्याला पहिल्यांदा विशद करतो. हा प्रकल्प सुरु होण्यापूर्वी पर्यावरण विभागाकडे मान्यतेसाठी सादर केला होता. सुरुवातीला राज्य पर्यावरण समितीसमोर सादर केला गेला. त्या समितीपुढे सुनावणी झाली. त्या सुनावणीमध्ये असे लक्षात आले की, हा जो प्रकल्प आहे हा संरक्षित वन आणि पैनगंगा अभयारण्यापासून १० कि.मी.च्या अंतरात येतो. त्यामुळे राज्यस्तरीय समितीने तो अहवाल केंद्रीय समितीपुढे सादर करावा अशा सूचना दिल्या. राज्य समितीसमोर अहवाल सादर केला होता त्यावेळी जन सुनावणी पूर्ण झालेली होती. त्या जन सुनावणीमध्ये स्थानिक लोकांनी त्याला विरोध केलेला आहे. ज्यावेळी हा अहवाल केंद्रीय समितीपुढे सादर केला गेला त्यावेळी केंद्रीय समितीने असे सांगितले की, या प्रकल्पाचा पूर्णपणे नव्याने टीओआर घेऊन पर्यावरणाचा अहवाल समितीसमोर सादर करावा. नवीन टीओआरमध्ये पुन्हा जन सुनावणी तयार करण्यात येणार आहे आणि त्या जन सुनावणीचा अहवाल केंद्रीय समितीपुढे सादर केला जाणार आहे. पुन्हा एकदा जन सुनावणी घेतली जाईल असे आश्वासनामध्ये सांगितले आहे त्यानुसार अजून जन सुनावणी झालेली नाही. कारण तो अहवाल अजून पूर्ण झालेला नाही. ती प्रक्रिया सध्या क्षेत्रीय स्तरावर चालू आहे. ही आजची सद्य:स्थिती आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, आपण हा सर्व्हे केव्हा केला ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, प्रशासकीय मान्यता महामंडळ स्तरावरुन २००९ मध्ये दिली गेली आहे. त्यानंतरच खर्च जन सुनावणीसाठी १५.६६ लाख, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कसाठी १४.२० लाख, सर्वेक्षण आणि अन्वेषण २७७.५७, वन खाते परवानगीसाठी ९.९२, माती परीक्षण शुल्कासाठी १९.६६ व इतर ५९ लक्ष असे एकूण ३.९६ कोटी रुपये पर्यावरणाचा अभ्यास आणि अन्वेषण करणे यासाठी झालेला आहे. प्रशासकीय मान्यतेनंतरचा हा खर्च आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, यापूर्वी राज्यात असे जे प्रकल्प राबविले जातात याची माहिती त्या अधिकाऱ्यांना असेल. वन क्षेत्राच्या अनुषंगाने केंद्रीय समितीकडे आपल्याला अहवाल पाठवावा लागतो. फक्त टीओआर करीता प्रयत्न करायचा, एखाद्या एजन्सीला काम द्यायचे आणि पुन्हा तो प्रस्ताव परत यायचा तोच प्रकार आहे. ही कोणती एजन्सी आहे?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सायन्स अँण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे ही पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत संस्था आहे. ही पुणे विद्यापीठाच्या अख्यत्यारीतील संस्था आहे.

यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, २०१३ नंतरची जनसुनावणी अद्यापपर्यंत प्रलंबित का आहे ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, जनसुनावणी करण्यापूर्वी केंद्रीय समितीसमोर अहवाल सादर केला जाणार आहे. त्यामध्ये तो अहवाल कसा असावा, यासाठी प्रथम टीओआर दिला जातो. त्या समितीमार्फत मंजूर केला जातो. त्यासाठी केंद्रीय समितीच्या गाईडलाईन्स आहेत. सद्य:स्थितीत टीओआर करण्याचे काम सुरु आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, केंद्रीय समितीच्या गाईडलाईन्सनुसार टीओआर पूर्वी का केला नाही ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, यामध्ये असे झाले की, २००७ च्या दरम्यान या कायद्यामध्ये दुरुस्ती झाली वराज्यस्तरीय पर्यावरण समिती त्यावेळेस पिक्चरमध्ये आली. पूर्वी सर्व पर्यावरणाची मान्यता केंद्रीय समितीमार्फत दिली जात असे. आता अलीकडे राज्यस्तरीय समिती आल्यानंतर सुरुवातीच्या काळात कन्फ्युझ झाल्या होत्या की, कोणते अहवाल केंद्रीय समितीसमोर आणायचे आणि कोणते अहवाल राज्य स्तरीय समिती समोर मांडायचे. यानंतर त्यांनी कॅलरीफिकेशन दिले की, जे १५ कि.मी.च्या अंतराचे संरक्षित वन खात्याचे प्रकल्प नसेल तरी सुध्दा केंद्रीय समितीसमोर ठेवण्यात येतील. त्या गाईडलाईन्समध्ये तो ट्रान्झीशनला पिरेड आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, या प्रकल्पात बुडीत क्षेत्र किती आहेत ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, १४ गावे बुडीत क्षेत्रात येतात.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, राज्यस्तरीय समितीवर लोकांनी आक्षेप घेतला असेल तर, केंद्र स्तरावरील आक्षेप तशाच प्रकारे राहतील काय ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, प्रत्येक क्षेत्रात बुडीत क्षेत्रात जाणार असले तरी मान्यता दिली जाते. बुडीत क्षेत्रातला जो भाग जातो त्यासाठी काय कार्यवाही करावी या संदर्भात आदेश समिती देत असते.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, बुडीत क्षेत्रात गेले तर आपण कशाप्रकारे पुनर्वसन करणार ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, समितीने दिलेल्या सूचनेनुसार पुनर्वसन केले जाते.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की,समितीची परवानगी घेतल्यावर खर्च केला जातो काय?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, अहवाल तयार करण्यासाठी खर्च झालेला आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की,तोच तर विषय समितीच्या लक्षात येत नाही की, ३ कोटी ९६ लाख रूपये हा आपण प्रथम खर्च झालेला दाखविला आहे आणि हे पूर्वी तपासले असते तर, शासनाचा खर्च वाचला असता.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, वेगवेगळ्या गोष्टीवरुन झालेला खर्च आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, विषय असा आहे की, टीओआर करण्याकरिता जनसुनावणी घ्यायची हा प्रकार थोडक्यात पर्यावरण समितीपुढे जाण्याच्या अगोदर हा प्रस्ताव करणे गरजेचे आहे काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, पर्यावरणाची मान्यता दोन टप्प्यात दिली जाते. पहिल्यांदा समितीसमोर टीओआर कसा करायचा कोणत्या मुद्दयावर पर्यावरणाची मान्यता घ्यायची व कोणते मुद्दे समितीसमोर मांडायचे यासाठी प्रथम टर्म ऑफ रेफरन्स ही समिती सादर करते. त्या गाईडलाईन्सनुसार टीओआर केला जातो. टीओआर मान्य केल्यानंतर पर्यावरणाचा अहवाल सादर केला जातो

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, समितीचे एवढेच म्हणणे आहे की, हा खर्च विभागाने टाळणे आवश्यक होता.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, केंद्रीय पर्यावरण विभागामार्फत अधिसूचना केली जाते त्यानुसार अहवाल तयार केला जातो.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन आपण संबंधित विभागाकडे पाठविणे आवश्यक होता. या प्रोजेक्टला केंद्राची मान्यता, पर्यावरणाची मान्यता व राज्याची मान्यता हे सर्व केल्यानंतर आपण जनसुनावणीवर नंतर खर्च करणे गरजेचे होते. आपण कोणतीही मान्यता न घेता खर्च केला असे निदर्शनास येते. या क्षेत्रात सिंचन क्षेत्र किती आहे ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की,: ९५०० हेक्टर प्रवाही उपसा सिंचन क्षमता आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, प्रकल्पावर पुढे कोणता प्रोग्रेस झाला ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, प्रकल्पावर पर्यावरणाची मान्यता नसल्यामुळे पुढे कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, याचा अर्थ शासनाचे पैसे वाया गेले.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, पर्यावरण मान्यतासाठी वरीलप्रमाणे आवश्यक खर्च आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, आपण प्रोजेक्ट पर्यावरण विभागाला पाठवून त्यांनी मान्य किंवा अमान्य केला असता, म्हणजे शासनाचे पैसे खर्च झाले नसते.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, केंद्रीय नियमात बदल होणे गरजेचे आहे. सध्या जे शासनाचे नियम आहेत त्यानुसार प्रथम प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर प्रकल्प अहवाल सादर केला जातो. प्रशासकीय मान्यतेच्यापूर्वी केंद्रीय अहवालावर मान्यता दिली जात नाही.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, पैसे खर्च करण्याच्या अगोदर आपण प्रोजेक्ट रिपोर्ट कागदावर तयार करुन समितीची मान्यता घेऊन पर्यावरण विभागाचा अहवाल हा आपल्याला तयार करावाच लागतो.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, ३ कोटी रूपये जो खर्च झालेला आहे. त्यात जनसुनावणीसाठी १५ लाख ६६ हजार रूपये खर्च झालेला आहे. सायन्स आणि टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांनी जो पर्यावरणाचा अभ्यास केला त्यासाठी १४ लाख २० हजार रूपये खर्च झाले. प्रकल्पाच्या डिटेल्स सर्वेक्षण आणि अन्वेषणासाठी २७७.५७ लाख रूपये खर्च झाला.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, एकदा अभ्यास करुन अहवाल सादर केला त्याला १४ लाख रूपये म्हटले आहेत. पुन्हा २७७ लाख रूपये.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी पार्कचा अहवाल आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, २७७ लाख रुपयांचा अहवाल कोणी तयार केलेला आहे ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, हे काम सर्वेक्षण आणि अन्वेषणावरुन तयार केलेला आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, सर्वेक्षणावरुनच अहवाल तयार केलेला आहे ना?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, प्रशासकीय मान्यतेनंतर सर्वेक्षण केले जाते.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, तुम्हीच म्हणालात की, प्रशासकीय मान्यता हा वेगळा विषय आहे. टीओआर आणि प्रशासकीय मान्यतेचा काहीही संबंध नाही. टीओआरसाठी तुम्ही एवढा खर्च केला त्याला आमचे ऑब्जेक्शन आहे. सर्वेक्षणासाठी ३-३ कोटी रूपये एवढा खर्च कसा काय येऊ शकतो? याचे उत्तर देण्यात यावे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, ३.९६ कोटी रूपयाचा खर्च आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, केंद्र सरकारच्या गाईडलाईन्सप्रमाणे हा खर्च आहे. आपल्या समितीचे शासनास एवढेच म्हणणे आहे की, यापुढे असे प्रकल्प करीत असताना, टीआरओ करीत असताना जे प्रकल्प फीजीबल आहेत ते अंतर्गत बाब म्हणून तपासून मग दाखल करावे. ही केंद्र सरकारच्या अखत्यारितील बाब असल्यामुळे आपण हे करु शकत नाही. केंद्र सरकारला एक फायनल रिपोर्ट पाहिजे. टीआरओ या कामासाठी ३ ते ३.५० कोटी रूपये खर्च कसा काय येऊ शकतो? याचे तुम्ही जस्टीफिकेशन द्या.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, हा माझा विषय नाही. त्यांनी जो खर्च दिलेला आहे हा सर्व खर्च पर्यावरणाच्या मंजुरीसाठी नसून खाली जे २७७.५७ लाख रूपये हा आपण फाऊंडेशनमध्ये बोअर घेतो, वेगवेगळ्याप्रकारचे सँम्पल घेतो, टेस्टींगला पाठवितो, धरणाचा पाया कुठे येईल, कुठल्या प्रकारचे धरण बांधावे लागेल, या सर्व गोष्टींसाठी हा खर्च केलेला आहे.वेगवेळ्या प्रकारचे सॅम्पल्स घेतो, ते मेरिमध्ये टेस्टिंगला पाठवतो म्हणजे धरणाच्या पाया कोठे येईल, कुठल्या प्रकारचे धरण बांधावे लागेल, काँक्रिटचे बांधावे लागेल का, मातीचे धरण बांधावे लागेल यासाठी हा खर्च केलेला आहे ?

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, हे आधीच कशाला करायचे ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदया, तो निव्वळ पर्यावरणाचा खर्च आहे. मी फक्त अँडिशनल माहिती देत आहे. पर्यावरण अहवाल जे आहेत त्या भागातील फ्लोरा आणि फौनाचा तो अभ्यास असतो. साधारणत: तिन्ही सेजनमध्ये त्या भागामध्ये कुठल्या प्रकारचे पक्षी येतात, कुठल्या प्रकारची फळझाडे वाढतात असा तो पूर्ण वर्षाच्या सायकलचा अभ्यास असतो. त्यासाठी आपण १४ लाख रूपये खर्च केले आहेत. २७७.५७ जो म्हणत आहेत ते फाऊंडेशन एक्सट्रॅडेशन, कॅनॉलची अलायनमेंट कोठे असावी, कोठे हार्ड रॉक लागणार आहे वगैरे या सर्व बाबींसाठी तो असतो. तो डिटेल इव्हेस्टिगेशनसाठी आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, त्याची गरज आहे काय ?हे काय चालले आहे? पर्यावरणासाठी जो खर्च होतो तो ठीक आहे. एकदा धरण बांधायचे ठरले समजा तर तुम्ही खडक कधी लागणार, वगैरे पाहू शकता. मात्र त्याकरिताचा २ कोटी ७७ लाख रूपयांचा जो खर्च आहे तो जास्त होतो. बाकी १४-१५ रूपयांचा खर्च हा बेसिक गोष्टींसाठी आहे. ज्या वाटेने जायचेच नाही त्याचा एवढा अभ्यास केला ? जर धरण बांधायचे नाही असे ठरले तर तो २ कोटी ७७ लाख रूपयांचा खर्च वाया जाईल ना. कोठे खणायचे, काय करायचे हा पुढचा विषय आहे. त्यांनी पाठविला त्याच्याकरिताच की, तो पूर्ण पाठविल्याशिवाय त्यांना पर्यावरण वगैरे गोष्टींचा विचार करुनच पाठवावा लागेल. नाही तर हार्ड रॉक कुठे आहे ते पाहिले नाही, अमुक केले नाही, असे ते म्हणतील असेच असेल ना ? अध्यक्ष महोदय, त्यांनी आपल्याकडे या या विषयांची मागणी केली होती असे तुम्ही दाखवा आणि म्हणून तुम्ही त्याचा अभ्यास करुन दिला.गाईडलाईन्स असतील. गाईडलाईन्स बघायला तरी मिळू द्या की, या गाईडलाईन्स होत्या की, इतके खणल्यावर बोअर लागते याची माहिती त्यांनी मागितली होती म्हणून आम्हाला करावे लागले. तुम्ही आम्हाला ते सबमिट करा. आम्ही काय मान्य करणार की, तुम्ही हा खर्च अनाठायी केला नाही. तुम्ही रफ प्रोजेक्ट रिपोर्ट पाठवू शकता. तुम्ही हे प्रुव्ह करायला पाहिजे. त्यांनी डिटेल सर्व्हे करता कामा नये होता. त्यांनी डिटेल सर्व्हे केला. अध्यक्ष महोदय, ही जनरल रिक्वायरमेंट आहे काय, महाराष्ट्रातील सर्व प्रकल्पांसाठी असेच केले जाते काय ? पर्यावरणाची मान्यता ही सर्वच प्रकल्पांमध्ये घ्यावी लागते. त्यामुळे ही जनरल प्रॅक्टिस आहे काय की, ही माहिती घेतली तर कळेल. मग आपल्याला पॉलिसी डिसीजन शासन लेव्हलवर रेकमंड करता येईल.प्रत्येक प्रोजेक्टला केंद्राकडून मंजुरी मागण्यामध्ये जनरल प्रोसिजर हीच आहे काय ? तसे असल्यास तसे सांगून हा विषय संपवावा. आम्ही जास्तीत जास्त काय करणार तर कमिटी सजेशन करणार. आपण आम्हाला हे सांगावे की, केंद्र सरकारकडे अशा प्रकारचा प्रोजेक्ट पाठविताना हीच प्रोसिजर आहे काय ?हा सोडून असे आणखी काही प्रकल्प आहेत काय, त्यावर काही खर्च केला आहे काय ? जनरली पैसै खर्च झाले, अमुक झाले हा विषय बाजूला करा. आमच्या सर्वांचे असे म्हणणे आहे की, केंद्राकडे आपण अशा पध्दतीचे जेवढे प्रोजेक्ट पाठवितो, त्यांना हीच प्रोसेस आहे काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आताच्या नियमानुसार हीच प्रोसेस आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, असे किती पैसे खर्च केले आहेत ? या पध्दतीने होणारे मोठे नुकसान आपण टाळू शकतो. माझा आग्रह आहे की, तुम्ही जो खर्च केला आहे, त्याचे जस्टिफिकेशन आम्हाला व पर्टिक्युलरली मला व्यवस्थित मिळालेले नाही. ते म्हणत आहेत की, मी त्या विषयाशी संबंधित नाही. तर तुम्ही आम्हाला असे दाखवा की, या गाईडलाईन्स होत्या आणि म्हणून आम्ही ही तपासणी केली. खरोखरच या गाईडलाईन्समध्ये हे १० मुद्दे होते आणि म्हणून आम्ही ते १० मुद्दे केले. अकरावा खर्च आम्ही मनाने केलेला नाही असे आम्हाला स्टॅटिस्टिकल आणि डिटेलिंग आवश्यक आहे. आम्ही या कन्क्ल्युजनला कसे काय येणार की, अनाठायी खर्च झालेला नाही ? असे किती प्रोजेक्ट्स आहेत की, जेथे असा खर्च झाला परंतु पुढे तो प्रोजेक्ट झाला नाही. तो अभ्यास तर त्यांच्याकडे आता नसेल ते आपण सोडून देऊ. याच्यावरुन आपल्याला हे लक्षात येईल की, अशा पध्दतीने हे चालते तर आपल्याला पुढे केंद्राकडेही हे सांगता येईल. याची डिटेल स्टडी जेव्हा आपण घेऊ तेव्हा आपण कुठे तरी कन्क्ल्युजनला येऊ आणि आपण केंद्राला काही तरी सांगू शकू की असे करु नका किंवा यांना सांगू शकू की असे करु नका. परंतु, असे करु नका हे कोणाला सांगायचे हे अजून कळलेच नाही.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आम्ही केंद्रिय पर्यावरण विभागाच्या ज्या गाईडलाईन्स आहेत, त्या आपल्याला सबमिट करतो.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, आम्हाला त्या द्या. आम्हाला असा रिपोर्ट बनवून द्या की, या गाईडलाईन्स होत्या, यामध्ये असे म्हटले होते की, बोअर वेल खणून आम्हाला याचे रिपोर्ट पाहिजे, त्याप्रमाणे आम्ही केले. पक्षांची माहिती पाहिजे म्हणून आम्ही पक्षांची माहिती घेतली.असे किती प्रकल्पात झाले की, हे सर्व झाले पण पुढे प्रोजेक्ट झाले नाहीत.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, हा पण झाला नाही. याचा अहवाल अजून केंद्रिय समितीला सबमिट झाला नाही.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, आम्ही हा प्रकल्प म्हणत नाही पण राज्यात असे अंदाजे किती प्रकल्प असतील ? ही माहिती १५ दिवसांनी द्यावी. आम्हाला हे कळू तर द्या की, आपण किती प्रकल्प पाठवले आणि किती मंजूर झाले ? यावर आपण शासनाला यावर सूचना किंवा विनंती करु की, हे असे असे आहे. असे किती प्रकल्प आहेत की, ज्यावर एवढा खर्च केला पण पुढे ते प्रकल्पच झाले नाहीत आणि खर्च वाया गेला.आता आपण या प्रकल्पाची माहिती मागितलेली आहे. ती माहिती पुढच्या वेळेस मागवू. केंद्रिय पर्यावरण विभागाने मान्यता नाकारलेल्या प्रकल्पांची माहिती सादर करावी.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, त्यावर झालेला खर्च आणि नाकारलेला प्रकल्पांचा तपशील सबमिट करतो.

**अभिप्राय व शिफारशी :-**

"सहस्त्रकुंड जलविद्युत (बहुउददेशिय) प्रकल्पाचे काम सुरू नसतानाही सहा कोटी रूपयाचा खर्च झाल्याबाबत" या विषयावरील श्री.विजयराव खडसे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०९०४४ ला उत्तर देताना मा. जलसंपदा मंत्री यानी "जनसुनावणीच्या वेळी जो प्रकल्प अहवाल सादर करण्यात आला होता, त्या अनुषंगाने पुन्हा एकदा जनसुनावणी घेतली जाईल" असे आश्वासन दिले आहे.

विभागीय सचिवानी साक्षीच्या वेळी असे नमूद केले की, केंद्रीय पर्यावरण समितीकडून पर्यावरण विषयक मान्यता घेण्याबाबतचे निदेश प्राप्त झाले होते त्या निदेशानुसार प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण समितीस सादर केला. केंद्रीय पर्यावरण समितीने दिनांक १२ नोव्हेंबर, २०१३ च्या बैठकीत नव्याने TOR सादर करण्याचे सूचित केले आहे. या निर्देशानुसार केंद्रीय पर्यावरण समितीस नव्याने TOR तयार करून सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

केंद्रीय अहवालावर मान्यता मिळण्यापूर्वी, प्रकल्पाच्या डिटेल्स, सर्वेक्षण आणि अन्वेषणासाठी २७७-५७ लाख रूपये खर्च झाला. जनसुनावणीसाठी १५ लाख ६६ हजार रूपये, सायन्स आणि टेक्नॉलॉजी पार्क, पुणे य़ाना जो पर्यावरणाचा अभ्यास केला त्यासाठी १४ लाख २० हजार असा एकुण ३ कोटी रुपये खर्च झालेला आहे. अशा प्रकारे केंद्रीय अहवालावर मान्यता मिळण्यापूर्वी एवढा खर्च होणे समितीस योग्य वाटत नाही. त्याबाबत समिती नाराजी व्यक्त करते.

विभागीय सचिवांनी समिती समोर स्पष्टीकरण दिल्यानुसार प्रथम प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर प्रकल्प अहवाल सादर केला जातो. प्रशासकीय मान्यतेपूर्वी केंद्रीय अहवालावर मान्यता दिली जात नाही. तथापि, **केंद्रीय समितीच्या अहवालाच्या मान्यतेपूर्वी सदर प्रकल्पावर एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेला खर्च अनाठायी असल्याचे समितीचे मत आहे. केंद्र सरकारकडे अशा प्रकारचा प्रकल्प पाठविताना हीच प्रोसिजर आहे काय, राज्यतील सर्व प्रकल्पासाठी असेच केले जाते काय, पर्यावरणाची मान्यता ही सर्वच प्रकल्पामध्ये घ्यावी लागते काय, तसेच याबाबत केंद्र शासनाच्या गाईडलाईन्स काय आहेत व अशा प्रकारचे किती प्रकल्प केंद्र शासनाकडे पाठविले व किती मंजूर झाले तसेच किती प्रकल्प केंद्रीय पर्यावरण विभागाने नाकारले व त्यावर किती खर्च झाला याबाबत सविस्तर माहिती समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तसेच सदर सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पासाठी पुन्हा एकदा जनसुनावणी घेण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे याबाबतची माहिती समितीला एक महिन्याच्या आत कळविण्यात यावी अशी ही समितीची शिफारस आहे.**

(२) **विधानसभा आश्वासन क्रमांक ५८ व ५९, विधानसभा कामकाज खंड १६६, पृष्ठ क्रमांक ५, दिनांक २२ जुलै, २०१३**

"मोहपा ( ता. कळमेश्वर, जि. नागपूर ) येथील खुमारी जलाशयातील पिण्याच्या पाण्यापासून नागरिक वंचित राहत असल्याबाबत" श्री. सुधाकर देशमुख व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमाक ११२०३७ ला उत्तर देताना मा.जलसंपदा राज्यमंत्री यांनी" हा विषय पाणीपुरवठा विभागाशी संबधित असल्याने त्यांच्याकडून हा प्रकल्प किती दिवसांत पूर्ण होईल याची माहिती घेऊन ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवेन. तसेच अध्यक्ष महोदय सन्माननीय सदस्यांनी विचारणा केल्याप्रमाणे सर्व प्रकारची तपासणी करण्यात येईल आणि तपासणीनंतर प्राप्त झालेल्या अहवालानुसार आवश्यक असलेला निधी निश्चित स्वरुपात देण्यात येईल" असे आश्वासन दिले आहे.

(१) **विभागाने आश्वासनावर केलेली कारवाई** - विभागाकडून आश्वासनाच्या पूर्ततेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, दिनांक ९/७/२००९ नुसार मोहपा पाणीपुरवठा योजनेसाठी रुपये ४१०.४४ लक्ष एवढया रक्कमेच्या पाणीपुरवठा योजनेच्या कामांना पाणीपुरवठा विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेकरिता अनुज्ञेय शासकीय अनुदान रुपये ३६९.४० लक्ष वितरीत करण्यात आलेले आहे. योजनेचे काम पूर्ण झाले आहे. योजना दिनांक ३/१/२०१४ रोजी कार्यान्वित करण्यात आली आहे.

खुमारी जलाशयात पुरेसा साठा उपलब्ध होण्याचे दृष्टीने उपाय योजनेबाबत क्षेत्रीय स्तरावर सर्वेक्षण व तपासणीची कार्यवाही सुरू आहे. आश्वासनावर शासनाने केलेल्या कार्यवाहीवर विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे समितीने निश्चित केले.

(३) **विभागीय सचिवांची साक्ष** - आश्वासनाचा विषय महत्वाचा व जिव्हाळ्याचा असल्याने समितीने दिनांक १७ नोव्हेंबर,२०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने आश्वासनाबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या सद्य:स्थितीच्या माहितीबाबत विचारणा केली असता, यासंदर्भात विभागाने सद्य:स्थितीच्या अहवालामध्ये नमूद केले की, मोहपा नगर परिषदेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यामार्फत पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेव्दारे प्रमाणे ९० लिटर प्रति माणशी प्रति दिन याप्रमाणे पाणीपुरवठा सुरु आहे.

खुमारी लघु पाटबंधारे प्रकल्पाचा उपयुक्त पाणी साठा ४.६२ दलघमी आहे. या प्रकल्पाचा पाणी साठा वाढविण्याच्या दृष्टीने जवळपासच्या खो-यातून या प्रकल्पात पाणी वळविणे शक्य आहे काय या पर्यायाचा अभ्यास पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळाने केला आहे. त्यानुसार प्रकल्पामध्ये जादा पाण्याची उपलब्धता होऊ शकत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, आश्वासन क्रमांक ५८ व ५९ ही एकाच प्रश्नाच्या अनुषंगाने दिलेली आहेत. त्याच्यामध्ये ५८ क्रमांकाच्या आश्वासनाचा विषय हा पाणीपुरवठा विभागाशी संबंधित होता. परंतु, जलसंपदा राज्यमंत्री महोदयांनी त्यावेळेस त्यांच्याकडून माहिती घेऊन उपलब्ध करुन देतो असे सांगितलेले होते. ही जी मोहपा नगर परिषदेची योजना होती, सध्या ती योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण झालेली असून त्यातून पाणीपुरवठा सुरु आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, परमाणशी ९० लिटर याप्रमाणे यातून पाणीपुरवठा सुरु आहे काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय त्या नुसार ती योजना मंजूर झालेली असून सुरु झालेली आहे.

आश्वासन क्रमांक ५९ हे मोहपा नगरपालिकेचा जो पाणी पुरवठा होता तो खुमारी लघु पाटबंधारे जलाशयावरुन होता. या जलाशयाची क्षमतावाढ करावी, असा एक मुद्दा उपस्थित झालेला होता. त्यावेळेस याबाबतची तपासणी करुन पाहण्यात येईल असे हे आश्वासन होते. या तलावाची क्षमता ४.६२ दशलक्ष घनमीटर इतकी आहे. तो लघु पाटबंधारे तलाव असल्यामुळे त्याच्या उंचीत वाढ करण्यासाठी किंवा त्या ठिकाणी पाणी उपलब्धता आहे की नाही याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यामध्ये क्षमता वाढ करण्यास पाणी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, कशाची क्षमतावाढ करण्याचा प्रस्ताव होता ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, अशी मागणी होती की पिण्यासाठी पाणी लागते त्यामुळे तेथे क्षमतावाढ करावी.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, तुम्ही मघाशी जे सांगितले त्याला तरी पाणी आहे काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, त्याला आहे. ४.६२ दशलक्ष घनमीटर इतकी क्षमता आहे तलावाची.

त्यावर मा. सदस्यांनी अशी विचारणा केली की, त्यातीलच पाणी देणार काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी होय असे सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :-

"मोहपा ( ता. कळमेश्वर, जि. नागपूर ) येथील खुमारी जलाशयातील पिण्याच्या पाण्यापासून नागरिक वंचित राहत असल्याबाबत" या विषयावरील श्री. सुधाकर देशमुख व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ११२०३७ ला उत्तर देताना मा.जलसंपदा राज्यमंत्री यानी ह्या विषय पाणीपुरवठा विभागाशी संबधित असल्याने त्यांच्याकडून हा प्रकल्प किती दिवसांत पूर्ण होईल याची माहिती घेऊन ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवेन. तसेच अध्यक्ष महोदय सन्माननीय सदस्यांनी विचारणा केल्याप्रमाणे सर्व प्रकारची तपासणी करण्यात येईल आणि तपासणीनंतर प्राप्त झालेल्या अहवालानुसार आवश्यक असलेला निधी निश्चित स्वरुपात देण्यात येईल" असे आश्वासन दिले आहे.

साक्षीच्या वेळी विभागीय सचिवानी स्पष्ट केले की, मोहपा नगर परिषदेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यामार्फत पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेद्वारे शहरात ९० लिटर प्रति माणशी प्रति दिन याप्रमाणे पाणीपुरवठा सुरू आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करते व मोहपा येथील नागरिकांना पाणीपुरवठ्याची सोय उपलब्ध केल्याबाबत समिती विभागाला धन्यवाद देते.

**(३) विधानसभा आश्वासन क्रमांक ३३९ व ३४० विभानसभा कामकाज खंड १६५, पृष्ठ क्रमांक १३, दिनांक १ ऑगस्ट, २०१३.**

"चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन नदी प्रकल्पाच्या नेट प्रेझेंट व्हॅल्यूच्या रकमेमध्ये वाढ झाल्याबाबत" या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेला उत्तर देताना मा.जलसंपदा राज्यमंत्री यांनी च्या महिन्यात मा.मुख्यमंत्री महोदयांची वेळ घेऊन निश्चितपणे बैठक घेतली जाणार आहे. तसेच लाभक्षेत्राच्या संदर्भातील बैठक माझ्या स्तरावर या महिन्यात आयोजित केली जाणार आहे" असे आश्वासन दिले होते.

(१) **विभागाने आश्वासनानुसार केलेली कारवाई-** विभागाकडून आश्वासनाच्या पूर्ततेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

यासंदर्भात मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९/७/२०१४ रोजी बैठक घेण्यात आली.

मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९/७/२०१४ रोजी बैठक घेण्यात आली. यासंदर्भात राज्य शासनाचे दिनांक २/८/२०१४ च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.आश्वासनावर शासनाने केलेल्या कार्यवाहीवर विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे समितीने निश्चित केले.

(२) **विभागीय सचिवांची साक्ष-** आश्वासनाचा विषय महत्वाचा व जिव्हाळ्याचा असल्याने समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने आश्वासनाबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या सद्य:स्थितीच्या माहितीबाबत विचारणा केली असता, यासंदर्भात विभागाने सद्य:स्थितीच्या विवरणामध्ये नमूद केले की, विधानसभा सन २०१३ चे दुसरे अधिवेशनात चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन नदी प्रकल्पाच्या वन जमिनीबाबत मा.आमदार महोदयांनी विचारलेल्या प्रश्नावर मा.राज्यमंत्री यांनी मा.मुख्यमंत्री यांचे सोबत बैठक घेतली जाणार आहे असे आश्वासन दिले होते. तथापि, याबाबत मा.मुख्यमंत्री यांचेकडे बैठक झालेली नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणी मा.राज्यमंत्री यांनी आश्वासन क्रमांक ३३९ व ३४० च्या अनुषंगाने दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी बैठक घेतली. सदर बैठकीत, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे अभिप्राय प्रतिक्षाधीन असल्याने मंत्रालयीन स्तरावरून पाठपुरावा करण्यात यावा. तसेच मा. ना. श्री. प्रकाश जावडेकर, पर्यावरण राज्यमंत्री, भारत सरकार यांना पत्र लिहुन या प्रकरणी सर्व संबंधीतांची बैठक लावून हुमन प्रकल्पाचा अंतिम वन मान्यतेचा प्रस्ताव निकाली काढण्याची विनंती करावी तसेच या पत्रामध्ये महाराष्ट्र राज्य विधानमंडळात सदरील प्रकल्पाची अंतिम वन मान्यतेसाठी आश्वासन देण्यात आल्याचे असल्याने प्राधान्याने कार्यवाही आवश्यक असल्याचे नमूद करावे असे निर्देशित केले.

या अनुषंगाने दिनांक १४/८/२०१४ रोजी मा.ना.श्री. प्रकाश जावडेकर, पर्यावरण राज्यमंत्री, भारत सरकार यांचे दालनात याबाबत बैठक झाली. सदर बैठकीत दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. I-३०/२००३-PT/(Part-IV) दि. १९/८/२०१४ अन्वये ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वनजीवांच्या प्रकल्प परिसरातील जोडलेला महत्वाचा भ्रमणमार्ग उपलब्धेबाबत प्रकल्पस्थळी शोध घेण्याकरिता/पाहणी करण्याकरिता (Identification of tiger corridor linkage) व त्याबाबत (वन्यजीवांच्या भ्रमणमार्ग खंडीत होत नसल्याबाबत) खात्री करुन सुचना/अहवाल सादर करण्याकरिता (Providing suggestions to ensure non disruption of Tiger Corridor) ४ सदस्यीय चमु गठीत करण्यात आली. सदर चमुतील सदस्यांनी दिनांक १०/९/२०१४ रोजी वन विभागातील अधिकाऱ्यांसोबत प्रकल्पस्थळी धरण संरेखा व धरणाखालील वन्यजीवाकरिता उपलब्ध होणाऱ्या भ्रमणमार्गाची पाहणी केली. तसेच दि.११/९/२०१४ रोजी चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळात आयोजित बैठकीतील चर्चे दरम्यान आवश्यक असलेली कागदपत्रे व नकाशे उपलब्ध करुन देण्यात आली. त्याचप्रमाणे दि. १६/१०/२०१४ रोजी मोहर्ली येथील वन विश्रामगृहात व दि. १९/१/२०१५ रोजी NTCA च्या प्रादेशिक कार्यालयात बैठक आयोजित करुन चर्चा करण्यात आली. सदर प्रकरणी प्रस्तुत समितीचा अहवाल (सर्व सदस्यांच्या अभिप्रायात्मक अहवालासह) NTCA, नवी दिल्ली यांना दि. २/३/२०१५ चे पत्रान्वये सादर झालेला आहे. पुढील निर्णय अद्यापि प्रलंबित आहे.

प्रकल्पाचे अडीअडचणीबाबत मा.मंत्री, वित्त, नियोजन व वने यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयीन दालनात दि.२९/६/२०१५ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत मा.मंत्री महोदयांनी, हूमन प्रकल्पाच्या प्रकल्प परिसरातील बफर झोन व वन्यजीवांच्या भ्रमणमार्ग प्रकरणी केंद्र शासनाकडे मा.राज्यमंत्री, पर्यावरण व वने यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करावी असे निर्देश दिले.

सदर प्रकल्पाचे वन विषयक अंतिम मान्यतेस्तव तत्वत: मान्यता पत्रातील अटींचे अनुपालनाकरिता पर्यायी वनीकरण व पाणलोट क्षेत्र उपचार कामाकरिता वन विभागाकडे जमा करावयाची अतिरिक्त फरकाची रक्कम रु. १०४.९७ कोटी शासनाकडून उपलब्ध होण्याकरिता महामंडळाचे पत्र दि.२५/२/२०१५ अन्वये मागणी सादर करण्यात आलेली आहे.

वन विभागाकडे भरणा केलेल्या व करावयाच्या अतिरिक्त रक्कमेचा (सन २०१४-२०१५ करिता) तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | | भरणा केल्याचा दिनांक | भरणा केलेली एकूण रक्कम | अतिरिक्त भरणा करावयाची रक्कम (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | वनाचे नक्त वर्तमान मुल्य (NPV) | ४/११/२००४ व ७/३/२०११ | १५४.९८ | ० |
| २ | पर्यायी वनीकरण (Compensatory Afforestation) | २९/३/१९९६, ४/११/२००४ व ७/३/२०११ | २९.५१ | १००.१२ |
| ३ | पाणलोट क्षेत्र उपचार (Catchment area treatment) | ४/११/२००४ व ७/३/२०११ | ३.३६ | ४.८५ |
| ४ | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील संरचनेचे बळकटीकरण (Infrastructure Development of TATR) | ४/११/२००४ | ०.५५ | ० |
| | | एकूण . . | १८८.४० | १०४.९७ |

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचे पत्र दिनांक ३/१०/२०१५ अन्वये पर्यायी वनीकरणाकरिता सन २०१४-१५ चे दराप्रमाणे उर्वरित फरकाची रक्कम रु. ११४.१६ लक्ष प्रकल्प यंत्रणेस भरणे आवश्यक असल्याचे व नवीन वर्ष २०१५-१६ चालू झाल्यामुळे सदर शिल्लक रक्कमेमध्ये पुनश्चः वाढ झाल्याचे, सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविले आहे.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की, आश्वासन होते माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घ्यावी आणि माननीय राज्यमंत्र्यांनी बैठक घेतली असे आश्वासनपूर्ततेबाबत नमूद केले आहे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घ्यावी असे आश्वासन दिलेले होते. परंतु, माननीय राज्यमंत्र्यांच्या स्तरावर बैठक घेऊन केंद्रिय पर्यावरण मंत्र्यांकडून पाठपुरावा करुन शेवटी शासनाकडून त्यांना विनंती करण्यात आली की, हे प्रकरण मार्गी लागावे. ते लागल्यानंतर त्यांनी त्या कॉरिडोअरच्या बाबतीत डेहराडूनच्या एलटीसीएने एक समिती दिनांक १६.१०.२०१४ रोजी नेमली. त्यावेळी त्या समितीमध्ये त्यांनी आपल्या जलसंपदा खात्याचा एक अधिकारीही घेतलेला होता. त्याचे पूर्ण अभिप्राय त्यांनी दिनांक २ मार्च, २०१५ रोजी केंद्र शासनास सादर केले आहेत.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की.सन २०१३ च्या दुसऱ्या अधिवेशनातील हा विषय आहे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय. त्यानंतर आपली बैठक झाली दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी झाली, बरोबर ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की.सन २०१३ च्या दुसऱ्या अधिवेशनातील हा विषय आहे. नंतर दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी बैठक झाली. त्यानंतर सन २०१५ मध्ये अहवाल पाठविला.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, मुळात केंद्र सरकारने एक समिती नेमावयाची होती त्याला जवळपास दीड वर्षाचा कालावधी लागला.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,समिती नेमण्याचा अधिकार केंद्र सरकारकडे होता काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,त्यामुळे हा वेळ लागला. आता प्रकरण कोणत्या स्टेजला आहे, आपल्याकडून फॉलो-अप होतो काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आमचे अधिकारी दोन-तीनदा जाऊन आले. मार्च, २०१५ मध्ये केंद्र शासनाला अहवाल सादर झालेला आहे. त्या अहवालामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, हा प्रकल्प रद्द करावा किंवा शिफ्ट करावा.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की.मग ही बैठक घेण्यामध्ये काय अर्थ आहे, या प्रकल्पासाठी किती खर्च झाला ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, एकूण २१० कोटी रुपये खर्च झालेला आहे. या २१० कोटी रुपयांमध्ये १५५ कोटी रुपये वन विभागाकडे एनपीव्हीची रक्कम भरलेली आहे. कॉम्पेन्सेशन फॉरेस्टसाठी ३० कोटी रुपये भरले. कॅचमेंट एरिया ट्रिटमेंटसाठी ३ कोटी रुपये भरले. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटसाठी म्हणजे ताडोबा व्याघ्र प्रकल्पासाठी ५५ लाख असे एकूण ८८ कोटी रुपये वन विभागाकडे भरलेले आहेत.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,आपण हे पैसे वन विभागाकडून परत घेणार काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आता वन विभागाकडून वाढीव मागणीसुद्धा आलेली आहे. त्यावर निर्णय घ्यावा लागेल.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,आपण एकीकडे सांगत आहात की, हा प्रकल्प रद्द करावा.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, असाल्या समितीचा अहवाल आहे.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,यावर निर्णय काय झाला ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, अजून निर्णय झालेला नाही. या संदर्भात केंद्र सरकारला निर्णय घ्यावा लागणार आहे.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,आपण वन विभागाकडे पैसे भरले आहेत. आपण आता काय करणार आहात?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आपण हे पैसे पूर्वीच भरलेले आहेत.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,आता वन विभाग पुन्हा आपल्याकडे पैशाची मागणी करीत आहे. हा प्रकल्प मंजूर होण्यासाठी आपण केंद्राला कन्व्हीन्स करण्याकरिता कोणते प्रयत्न केले ? कारण आपण वन विभागाकडे २१० कोटी रुपये भरलेले आहेत. तसेच वन विभागाकडून वाढीव मागणी येत आहे. प्रकल्प मंजूर नसताना पैसे कसे भरले ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, प्रकल्प मंजूर होता.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,मग तो रद्द कसा झाला ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, याला फार मोठा इतिहास आहे. ही केस सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेली होती. सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा आब्झर्व्हेशन टाकून प्रकल्पास मंजुरी देण्यास हरकत नाही असे सांगितले. त्यावेळच्या केंद्र सरकारने सादर केलेले प्रतिज्ञापत्र प्रोजेक्टच्या बाजूने होते. दरम्यानच्या काळात वातावरण थोडे थोडे बदलत गेले. यामध्ये काही एनजीओ उतरल्या व प्रोजेक्ट करु नये अशा मागण्या आल्या.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आपल्या बाजूने आहे. एनजीओ आपल्या विरुद्ध आहे. एनजीओ सर्वोच्च न्यायालयात गेल्या आहेत काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आता सध्या न्यायालयात केस नाही

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,मग आपण केस टाकावी. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या बाजूने निकाल दिलेला आहे. प्रकल्प होऊ द्यायचा किंवा नाही हे एनजीओ कोण ठरविणार ? सर्वोच्च न्यायालयाचा निकाल अंतिम आहे. त्यावर पुन्हा क्वेरी काढण्याची गरज नाही. त्या निकालाच्या विरोधात कोणी गेले असते तर गोष्ट वेगळी होती ? चार एनजीओ एकत्र येऊन प्रकल्प बंद करावा असे सांगतात आणि आपण तसे करतो हे बरोबर नाही. मग पुन्हा डीएसआर रेट वाढणार, प्रकल्पाचा खर्च वाढणार. सर्वच बाबतीत खर्च वाढणार. आपणास एकतर दीड वर्ष उशीर झालेला आहे. या प्रकल्पास काही लोक विरोध करतात तेव्हा आम्हाला संरक्षण द्यावे याकरिता आपण सर्वोच्च न्यायालयात जायला पाहिजे होते.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आपला प्रोजेक्ट मंजूर होता. बफर झोनची लिमिट वाढल्यामुळे ऑब्जेक्शन घेतलेले आहे. वाघांसाठी असलेल्या भ्रमणमार्गाची रुंदी कमी होत आहे.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,आपण या प्रकल्पासाठी इतकी रक्कम भरलेली आहे की त्या रकमेमध्ये अन्य एक-दोन प्रकल्प पूर्ण झाले असते. समितीला अहवाल सादर करावयाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर विभागाने त्याकडे लक्ष दिलेले नाही, आपण सर्वोच्च न्यायालयाचा निकाल मान्य केला नाही असेच अहवालामध्ये नमूद करावे लागेल.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महोदय, मी प्रधान सचिव,जलसंपदा विभाग, या ठिकाणी कार्यकारी संचालकांनी सांगितले की, नॅशनल टायगर कॉन्झर्व्हेशन ऑथॉरिटी ही व्याघ्र संदर्भात निर्णय घेत असते. ही चार सदस्यांची कमिटी होती. त्या कमिटीने प्रत्यक्ष जागेची पाहणी केली होती. कमिटीमधील तीन सदस्यांचे असे म्हणणे होते की, या प्रकल्पामुळे वाघांची उन्हाळ्यामध्ये पलीकडे जाण्याच्या प्रवृत्तीला आळा बसण्याची शक्यता आहे म्हणून हा प्रकल्प घेऊ नये. या कमिटीमध्ये जलसंपदा विभागाचा प्रतिनिधी होता त्यांनी या संदर्भात आपली डिसेन्ट नोट दिलेली आहे. त्या डिसेन्ट नोटमध्ये म्हटलेले आहे की, हा व्याघ्र प्रकल्पाचे हित जोपासणारा प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे तेथे पाण्याची उपलब्धता वाढणार आहे. त्याशिवाय जमिनीखालील पाण्याची पातळी वाढणार आहे. चरणाऱ्या जनावरांची संख्या वाढणार असल्यामुळे व्याघ्र प्रकल्पाला हा प्रकल्प पूरक ठरणार असल्यामुळे हा प्रकल्प रद्द करणे चुकीचे होईल. त्या डिसेन्ट नोटसहित हा अहवाल एनटीसीएकडे सादर झालेला आहे. आपण वन विभागाकडे एनपीव्ही भरलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आपल्या बाजूने लागलेला आहे. दुर्दैवाने सन २०१० मध्ये जो बफर झोन वाढला त्यामध्ये वन विभागाने सन २००४ मध्ये इन-प्रिन्सीपल क्लिअरन्स मिळाला होता तो अजूनही वैध आहे काय अशाप्रकारचा रेफरन्स केल्यामुळे ही अडचण झालेली आहे. आम्ही या संदर्भात वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. मी आताच कार्यकारी संचालकांना सांगितले आहे की, वन विभागाने ११४ कोटी रुपये जी अधिकची वाढीव रक्कम भरण्याबाबत कळविले आहे ती रक्कम आपण भरु या. शेवटी ती इंटर डिपार्टमेंटल ट्रान्सफर आहे. कारण दरवर्षी एनपीव्हीमध्ये १० टक्के वाढ होते. तेव्हा आपण पैसे भरले नाहीत या सदराखाली प्रकल्प नाकारु नये.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,जर हा प्रकल्प रद्द झाला तर आपण भरलेले पैसे परत मिळतील काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की, सर्वोच्च न्यायालयात कोण गेले होते ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या प्रकल्पामुळे पर्यावरणाला धोका आहे म्हणून बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी कोर्टात गेली होती.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने एनटीसीएला पार्टी केले होते काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सर्वोच्च न्यायालयात सर्वांना पार्टी करण्यात आले होते.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,सर्वांना पार्टी केले असताना सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे.त्यांनी त्यांचे म्हणणे मांडलेले असताना पुन्हा म्हणणे मांडण्याची गरज काय आहे? सर्वोच्च न्यायलयाच्या निकालाला स्टीकअप राहणे एवढेच आपले काम आहे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या प्रकल्पाच्या कामासाठी उर्वरित फंड मिळण्यासाठी हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणी सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,सन २००८-०९ मध्ये या प्रकल्पाची सुप्रमा १ हजार १६ कोटी रूपयांची होती. आता त्यामध्ये आणखी वाढ होणार आहे. ओरिजिनल प्रोजेक्ट सन १९७७-७८ चा आहे आणि त्यावेळची किंमत ३३ कोटी रूपये होती.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, हा बजेट २ दोन हजार कोटी रूपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,मग आता हे अॅक्टीव्ह कन्सीडरेशनमध्ये आहे की नाही ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की,शासनाचे सर्वसाधारण मत आहे की, हा प्रकल्प पूरक असून तो करणे गरजेचे आहे. जलसंपदा विभागाचे देखील असेच म्हणणे आहे की, हा प्रकल्प पूर्ण करणे गरजेचे आहे. मध्यंतरी बफर झोन डिक्लेअर करण्यात आला आणि त्यानंतर चार सदस्य समितीचा अहवाल आला त्यामुळे थोडीशी अडचण निर्माण झालेली आहे. ती अडचण दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,प्रकल्पाचा खर्च दोन हजार कोटी रूपयांपर्यंत जाईल ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय. डिटेल वर्कींग लागेल.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,आम्ही अहवालामध्ये काय म्हण वचे ?जी चार सदस्यांची कमिटी आहे त्यावरील सदस्यांची नावे समजतील काय, ते त्यातील तज्ज्ञ आहेत काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, मी त्या समितीचा मेंबर आहे. त्या समितीमध्ये एनटीसीएचे असिस्टंट इन्स्पेक्टर जनरल, वाईल्ड लाईफ इन्स्टीटयुट ऑफ इंडियाचे सायन्टिस्ट श्री.बिलाल आणि चीफ कन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट, ताडोबा हे सदस्य आहेत. या प्रकल्पाला सन २००४ मध्ये मान्यता मिळालेली आहे. ताडोबा-नवेगाव-नागझिरा-कान्हा असा वाघांना भ्रमण करण्यासाठी कॉरीडॉर आहे. हा भ्रमणमार्ग खंडीत होतो अशी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने सीईसीकडे तक्रार केली होती. सीईसीकडे हिअरिंग झाले त्यानंतर ही केस सर्वोच्च न्यायालयाकडे गेली. त्यामध्ये फॉरेस्ट विभागाने आपले मत मांडले त्यामध्ये शेवटी असे म्हटले होते की, This project is born for the wildlife. त्या आधारावर एनपीव्हीची रक्कम एक रकमी भरावी असा निर्णय देऊन सर्वोच्च न्यायालयाने हा प्रकल्प बांधण्यास परवानगी दिली होती. दरम्यान आपण एनपीव्हीची रक्कम भरु शकलो नाही. सन २०१० मध्ये कोअर रिजनच्या बाहेर बफर झोन डिक्लेअर करण्यात आला. बफर झोन डिक्लेअर केल्यामुळे सन २००४ मध्ये वन विभागाची मान्यता मिळालेली आहे त्याच्या वैधतेवर काय परिणाम होईल याबद्दल वन विभागाने एनटीसीला रिफरन्स केला. एनटीसीएने काही उत्तर दिले नाही. दरम्यान माननीय राज्यमंत्र्यांनी मिटींग घेऊन सांगितले की, आपण केंद्रीय राज्य मंत्र्यांकडे पाठपुरावा करु. दिनांक १४.८.२०१४ रोजी ही मिटींग घेण्यात आली. त्या मिटींगमध्ये समिती नेमण्याचा निर्णय झाला.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,आपण सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला ओव्हररुल करु शकतो काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, माझ्या डिसेंट नोटमध्ये म्हटलेले आहे की, एकदा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर समिती नेमण्याचे काही कारण नाही.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,सर्वोच्च न्यायालयाने एकदा निकाल दिल्यानंतर त्यावर अपील नाही. त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, एनजीओच्या तक्रारीवर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे.

त्यावर मा.सदस्यांनी अशी विचारणा केली की,आपण जे वन विभागाकडे ११० कोटी रूपये भरले आहेत ते परत मिळण्याची गॅरेन्टी आहे.या प्रोजेक्टची मूळ किंमत किती होती ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सन १९८३ साली या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळाली त्यावेळी प्रकल्पाची किंमत ३३ लाख रूपये होती. त्यानंतर सन २००९ ला प्रथम प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यावेळी त्याची किंमत १०१६ कोटी रूपये होती. आता ती जवळपास २ हजार कोटीच्या आसपास गेली आहे. हा सिंचनाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे ३५ हजार ७५० हेक्टर क्षेत्र सिंचित होणार आहे आणि जवळपास १०७ गावांना याचा लाभ होणार आहे.

**अभिप्राय व शिफारशी:**

"चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन नदी प्रकल्पाच्या नेट प्रेझेंट व्हॅल्यूच्या रकमेमध्ये वाढ झाल्याबाबत" या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यानी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेला उत्तर देताना मा.जलसंपदा राज्यमंत्री यानी च्या महिन्यात मा मुख्यमंत्री महोदयांची वेळ घेऊन निश्चितपणे बैठक घेतली जाणार आहे. तसेच लाभक्षेत्राच्या संदर्भातील बैठक माझ्या स्तरावर या महिन्यात आयोजित केली जाणार आहेछ असे आश्वासन दिले होते.

विभागीय सचिवानी साक्षीच्या वेळी नमूद केले की, सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा आब्झर्व्हेशन टाकून प्रकल्पास मंजुरी देण्यास हरकत नाही असे सांगितले आहे.तथापि काही एनजीओ ठतरल्या व हा प्रकल्प करू नये अशा मागण्या करण्यात आल्या.

वास्तविक पाहता हा व्याघ्र प्रकल्पाचे हित जोपासणारा प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे तेथे पाण्याची उपलब्धता वाढणार आहे त्याशिवाय जमिनीखालील पाण्याची पातळी वाढणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प रद्द करणे योग्य होणार नाही असे समितीचेहे मत आहे.

**सबब सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा अशी समिती शिफारस करीत आहे व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा.**